MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष एकोणिसावे / अंक १ / जानेवारी २०१८

## संपादकीय

### वसाहतवाद - भौगोलिक आणि सांस्कृतिक

इंग्रजांचा भारतातील वसाहतवाद किंवा साम्राज्यवादावर इतके लिहिले गेले आहे की, यावर नव्याने काही लिहिता येईल की नाही (?) अशी शंका नेहमीच वाटते. तरीही या विषयाचा ऊहापोह करणारी आणि संशोधन करून नवीन माहिती देणारी अनेक पुस्तके बाजारात येतच आहेत. 'दिशा'चे जुलै (वसाहतवाद जुना आणि नवा), आणि सप्टेंबर २०१७ [(लुटमार, वसाहतवादी (स्वातंत्र्यपूर्व) आणि लोकशाहीवादी (स्वातंत्र्यानंतर)] चे अग्रलेखही या विषयाशी निगडित आहेत. श्री. शशी थरूर यांच्या An Era of Darkness: The British Empire in India या पुस्तकाने पुन्हा एकदा या विषयाला उजाळा मिळाला आहे. व्यापार, परंपरागत उद्योगधंदे ते अर्थकारणापर्यंत, ब्रिटिशांच्या वसाहतवादामुळे भारताची कशी वाताहात झाली, हे त्यांनी पुन्हा एकदा सप्रमाण दाखवून दिले आहे.

सामान्य माणसाशी निगडित असलेले ग्रामोद्योग आणि कुटिरोद्योग नष्ट झाल्यामुळे शतकानुशतके परस्परावलंबी असणारे व्यवसाय आणि त्यावर अवलंबून असणारे ग्रामीण अर्थकारण कोलमडून पडले.

स्वातंत्र्य मिळून आज आपल्याला ७० वर्षे झाली असली, तरी आजही भारतामध्ये काही बुद्धिजीवींना असे वाटते की, वसाहतवादामुळे भारताचा फायदा झाला. शुक्रवार ८ जुलै २००५ ला आपले माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना सन्माननीय डॉक्टरेट ऑक्सफर्ड विद्यापीठाने समारंभपूर्वक बहाल केली. उत्तरादाखल केलेल्या भाषणामध्ये डॉ. मनमोहन सिंग म्हणतात,

"Our notions of the rule of law, of a constitutional government of a free press of a professional civil service of modern universities and research laboratories have all fashioned in the crucible where an age-old civilization met the dominant Empire of the day. There are all elements which we still value and cherish. Our judiciary, our legal system, our bureacracy and our police are all great institution, derived from British - Indian administration and they have served the country well".

१६०० मध्ये इंग्रज भारतात आले. १६०७ मध्ये ते अमेरिका खंडामध्ये पोचले. इंग्रज आणि युरोपियन लोकांनी तिथे घरे केली, शेती आणि व्यवसाय चालू केले. १७७५ मध्ये अमेरिकेतील १३ राज्यांनी इंग्रजांच्या वसाहतवादाविरुद्ध युद्ध चालू केले आणि १७८३ ला इंग्रजांच्या वसाहतवादातून मुक्ती मिळवली. अमेरिकेतील बहुतांशी हे लोक संस्कृती आणि भाषेने इंग्रजच होते. तरीही इंग्रजांचा वसाहतवाद त्यांनी स्वीकारला नाही. अमेरिकेतल्या कुठल्याही

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

राष्ट्राध्यक्षांनी अजूनपर्यंत इंग्रजांकडून आम्ही स्वातंत्र्य, लोकशाही, नोकरशाही किंवा घटना घेतली असे केव्हाही सांगितले नाही. एवढेच नाही तर वजनापासून मोजमापापर्यंत आपली वेगळी परिमाणे निर्माण केली. अमेरिका एकेकाळी इंग्रजांची वसाहत असली तरीही, अमेरिका कॉमनवेल्थ संघटनेची सभासद नाही. राणीच्या अधिपत्याला त्यांनी केव्हाही मान्यता दिली नाही. १९४९ साली आर्यलंड प्रजासत्ताक झाले आणि त्यांनीही कॉमनवेल्थ संघटनेचे सभासदत्व सोडून दिले. १९४७ साली आम्हांला स्वातंत्र्य मिळाले पण श्री. मेकॉलेच्या शिक्षण व्यवस्थेच्या अपेक्षेप्रमाणे, संस्कृती आणि विचारांनी आजही आपण इंग्रजांचा सांस्कृतिक वसाहतवाद घट्ट कवटाळून ठेवला आहे.

आपल्याला भौगोलिक स्वातंत्र्य मिळालं असलं तरी, न्यायव्यवस्था आणि न्यायालयं, नोकरशाही ते लोकशाही यांच्या व्यवस्थेमधील वसाहतवादाला 'पोषक'मूल्य न ओळखता, त्यामध्ये काडीचाही बदल न करता, ती उसनवारी आपण तशीच चालू ठेवली; याचा हा कबुली जबाबच श्री. मनमोहन सिंग यांनी दिला. एवढेच कशाला श्री. शशी थरूर यांची श्री. करण थापर यांनी २०१६ मध्ये त्यांच्याच पुस्तकावर एक मुलाखत घेतली. श्री. मनमोहन सिंग यांचाच दाखला देऊन, कायद्याचे राज्य ही ब्रिटिशांकडून आपल्याला मिळालेली देणगी नाही का? असा प्रश्न त्यांना विचारला.

दुर्दैवाने स्वातंत्र्यपूर्व काळातही अनेक बुद्धिजीवींना इंग्रजांचे राज्य हे ईश्वरी वरदानच वाटत होते. श्री. महादेव गोविंद रानडे यांनी तर तसे म्हटलेच आहे. पण १८५० च्या सुमाराला लोकहितवादींनीही आपल्या 'शतपत्रांत'ही या नव्या राजवटीचे आणि बदलाचे उत्साहाने आणि मनःपूर्वक स्वागत केले आहे.

ब्रिटिशांचे राज्य म्हणजे त्यांचा वसाहतवाद याचे खरे स्वरूप काय होते आणि आपल्या संस्कृती आणि परंपरागत व्यवसायांवर त्याचा काय परिणाम झाला, याकरता इंग्रजांनीच लिहून ठेवलेले लिखाण पुरेसे बोलके आहे. थॉमस मन्रो हे तत्कालीन मद्रास प्रांताचे राज्यपाल होते. १८१३ साली 'हाऊस ऑफ कॉमन्स'च्या एका समितीसमोर भारतीय व्यवस्थेबद्दल त्यांनी खालील विचार मांडले.

"If a good system of agriculture, unrivalled manufacturing skill, a capacity to produce whatever contribute to convenience or luxury: schools established in every village for teaching reading, writing and arithmatic : the general practise of hospitality and charity among each other and above all a treatment of the female sex, full of confidence, respect and delicasy, are among the signs which denote a civilized people, then the Hindus are not inferior to the nations of Europe; and if civilization is to become an article of trade between the two countries, I am convinced that this country (England) will gain by the important cargo".

संस्कृतीच्या सगळ्या अंगांवरती मन्रोनी आपली निरिक्षणे नोंदवून तत्कालीन समाजाचे चित्रच उभे केले आहे. १८१८ साली पेशवाई खालसा झाली आणि सर्व भारत हा इंग्रजांच्या वसाहतवादाखाली आला. १८५३ साली श्री. जॉन डिकीन्सन यांनी 'Government in India Under a Bureaucracy' हे प्रसिद्ध पुस्तक लिहिलं. अवघ्या ५० वर्षांत ब्रिटिशांची नोकरशाही आणि 'कायद्याच्या राज्या'नी काय परिस्थिती केली याचे वर्णन त्यांनी केले आहे.

"Since India has come under British rule her cup of grief has been filled to the brim, aye, it has been full and running over. The unfortunate Indian people have had their rights of property confiscated: their claims on justice and humanity trampled under foot: their manufacturers, towns and agriculturists beggared: their excellent municipals institutions broken up: their judicial security taken away: their morality corrupted: and even

(पृष्ठ क्र.४० वर)




वर्ष एकोणिसावे/अंक ७/जानेवारी २०१८

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २२ वे/अंक ७ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | बत्तीसावी मोस्ट्राटेक स्पर्धा | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | स्वदेशवेध-०६ उत्तराखंडाची सहल | श्री. नरेंद्र गोळे | ७ |
| ४) | गुप्तकालीन भारत : प्राचीन भारतातील 'सुवर्णयुग' | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | १२ |
| ५) | चरित्रलेखनाबाबत... | श्री. अरविन्द दोडे | २० |
| ६) | स्वयंसिद्धा | सौ. कांचन गणेश मोहिते | २३ |
| ७) | क्वालिटी ऑफ गुड मार्केटिंग मॅनेजर | श्री. सुर्‌चवाल्मिक सुर्यवंशी | २६ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | २७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश ‘विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा’ या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# बत्तीसावी मोस्ट्राटेक स्पर्धा

*ब्राझील देशाच्या नोव्हो हॅम्बुर्गो शहरात ऑक्टोबर २०१७ मध्ये भरलेल्या मोस्ट्राटेक स्पर्धेतील अनुभव या लेखात विशद केलेले आहेत. – संपादक*

ब्राझील देशाच्या नोव्हो हॅम्बुर्गो शहरात दरवर्षी विज्ञान तंत्रज्ञान स्पर्धा भरविली जाते. फंडासाव लिबरॅटो (Fundasav Liberato) नावाची एक तांत्रिक शिक्षण देणारी संस्था या शहरात आहे. या संस्थेच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन केले जाते. शाळकरी मुलांसाठी असलेली ही स्पर्धा मोस्ट्राटेक (Mostratec) या नावाने प्रसिद्ध आहे. त्याची सुरुवात जरी स्थानिक पातळीवर झाली तरी तिने आता जागतिक स्वरूप प्राप्त केले आहे. ब्राझील खेरीज सुमारे पंचवीस देशांचे प्रतिनिधी या स्पर्धेत सहभागी होतात. दरवर्षी ऑक्टोबर महिन्यात ही स्पर्धा भरविली जाते. ऑक्टोबर २०१७ मध्ये भरलेली स्पर्धा ही बत्तीसावी होती. या स्पर्धेत सहभागी होण्याची संधी आम्हाला मिळाली. तसे पाहता ठाणे येथील विद्या प्रसारक मंडळाला आयोजकांकडून मागील पाच वर्षांपासून बोलावणे पाठविण्यात येत आहे. परंतु अंतर खूप असल्याने दरवर्षी चमू पाठविणे आम्हाला शक्य झाले नाही. आयोजकांच्या निमंत्रणावरून सौ. आनंदीबाई जोशी शाळेतील विद्यार्थ्यांना घेऊन आम्ही २८ व्या मोस्ट्राटेक स्पर्धेत भाग घेण्यासाठी ऑक्टोबर २०१३ मध्ये गेलो होतो. त्यानंतरच्या वर्षी म्हणजे २०१४ ला आम्हाला जाणे शक्य झाले नाही. २०१५ला विद्या प्रसारक मंडळाच्या पॉलिटेक्निक संस्थेतील विद्यार्थ्यांना घेऊन तिसाव्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आम्ही गेलो होतो. त्यानंतरच्या वर्षी म्हणजे २०१६ला आम्हाला जाता आले नाही. म्हणून २०१७ च्या बत्तीसाव्या स्पर्धेत सहभागी होण्याचे आम्ही ठरविले. यावेळेस स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी विद्या प्रसारक मंडळाच्या वेळणेश्वर येथील महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयातील (VPM's Maharshi Prashuram College of Engineering) दोन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे बत्तीसाव्या मोस्ट्राटेक स्पर्धेचा अनुभवदेखील फारच ज्ञानवर्धक होता. हा लेख याच अनुभवावर आधारलेला आहे.




**बत्तीसाव्या मोस्ट्राटेक स्पर्धेचा फलक**

नोव्हो हॅम्बुर्गो नावाचे गाव ब्राझील देशाच्या दक्षिण भागात वसलेले आहे. जर्मन देशातील हॅम्बुर्ग (Hamburg) शहरातील लोकांनी हे शहर वसविले. त्यांनी या नवीन गावाला न्यू हॅम्बुर्ग (New Hamburg) असे नाव दिले होते. ब्राझीलवर पोर्तुगीजांचे राज्य होते. तेथील भाषेवर पोर्तुगीज भाषेचा प्रभाव आहे. त्यामुळे न्यू हॅम्बुर्गचे रूपांतर नोव्हो हॅम्बुर्गो (Novo Hamburgo) असे झाले. चामडी वस्तूंच्या निर्मितीसाठी हे शहर प्रसिद्ध आहे. या शहरात अनेक प्रकारची औद्योगिक प्रदर्शने नियमितपणे भरविली जातात. या प्रदर्शनाचे आयोजन करणे सुकर व्हावे यासाठी शहराच्या नगरपालिकेने एका प्रदर्शन संकुलाची निर्मिती केली. त्याचे नामकरण फेनॅक (Fenac)

असे करण्यात आले आहे. बत्तीसाव्या मोस्ट्राटेकचे आयोजन याच संकुलात करण्यात आले होते. दोन मजल्यांवर पसरलेल्या या संकुलात प्रदर्शनीय वस्तू ठेवण्यासाठी पुरेशी जागा आहे. त्याचबरोबर संकुलात एक मोठे सभागृह आणि छोट्या गटाला चर्चेसाठी उपयोगी पडतील अशा लहानलहान खोल्या आहेत. मोठ्या संख्येने लोक प्रदर्शन पाहायला येणार म्हणून त्यांच्या खाण्यापिण्याची सोय व्हावी यासाठी खाद्यपदार्थांचे पुरेसे स्टॉल उभारता येतील अशी व्यवस्था केलेली आहे. सोयीसाठी तळमजल्यावर खाण्याची सोय आणि पहिल्या मजल्यावर प्रदर्शन अशी विभागणी करण्यात आली होती.



तळमजल्यावरील भोजन व्यवस्था

एका औपचारिक उद्घाटन समारंभाने मोस्ट्राटेक स्पर्धेची सुरुवात झाली. यासाठी स्पर्धेच्या ठिकाणीच एक छोटेखानी स्टेज बनविले होते. तिथे पाहुण्यांना उभे राहायला सांगून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. ज्याचे नाव पुकारले जाईल त्याने पुढे येऊन माईकवरून बोलावे अशी अपेक्षा होती. सर्व कारभार पोर्तुगीज भाषेतून चालला होता. त्यामुळे कोण नेमके काय बोलले हे आम्हाला समजले नाही. तरीही एक गोष्ट मात्र आमच्या लक्षात आली. ती म्हणजे, प्रत्येक व्यक्ती मोजक्या शब्दात आपले विचार मांडत होती. आपल्याकडे उद्घाटन समारंभाला तासन्तास लागतात. त्यामुळे प्रदर्शनाला आलेली मुले कंटाळून जातात. असे तिथे झाले नाही. उद्घाटनाचा संपूर्ण सोहळा केवळ अर्ध्या तासात संपला. त्यानंतर प्रत्येकजण आपापल्या स्टॉलकडे निघून गेला. आपला प्रकल्प सादर करता यावा यासाठी प्रत्येकाला एक स्वतंत्र कक्ष देण्यात आला होता. प्रत्येक कक्षात पोस्टर (Poster) लावण्याची सोय आणि विजेचे कनेक्शन पुरविण्यात आले होते. प्रकल्प पद्धतशीर लावण्यासाठी संस्थेचे विद्यार्थी मदतीला होते. प्रदर्शनात सगळे मिळून सहाशेहून जास्त प्रकल्प होते. त्या सर्वांना चोख सुविधा पुरविण्यात आल्या होत्या. जर काही अडचण आलीच तर ते सोडविण्यासाठी केंद्रस्थानी कार्यालय उभारले होते. तेथे जायचा आवकाश की आपल्याला मदत मिळेल अशी सोय करण्यात आली होती.



प्रदर्शनाचे दृश्य


श्री. हृषिकेश भावे आणि श्री. साहिल कदम हे वेळणेश्वर येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकणारे दोन विद्यार्थी स्पर्धेत सहभागी झाले होते. त्यानी जो प्रकल्प नेला होता त्याचा समावेश मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागात करण्यात आला होता. आपण शेतात काहीही पेरतो तेव्हा पेरलेल्या धान्याखेरीज इतर अनेक वनस्पती शेतात वाढतात. हा कचरा काढून टाकणे आवश्यक असते. नाहीतर धान्याच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होतो. ते टाळण्यासाठी नियमितपणे निंदन आणि खूरपण करावे लागते. सध्याच्या काळात या कामासाठी मजूर मिळणे कठीण झाले आहे. या समस्येवर मात करण्यासाठी महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाने

एक यंत्र विकसित केले. तेच यंत्र घेऊन हे विद्यार्थी स्पर्धेला आले होते. विषय साधाच होता पण शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा होता. शेतीत पिकणाऱ्या धान्यावर आपण सगळेजण अवलंबून असल्याने या विषयात सगळ्यांनाच रस होता. त्यामुळे प्रदर्शन पाहायला येणाऱ्या अनेक लोकांनी या प्रकल्पाजवळ गर्दी केली.



**भारतातून नेलेले प्रदर्शनीय उपकरण**

मोस्ट्राटेकला भेट देणाऱ्या लोकांना शाळकरी विद्यार्थ्यांच्या प्रकल्पाबरोबरच देशात चाललेल्या संशोधन कार्याची माहिती व्हावी असा आयोजकांचा प्रयत्न असतो. त्यासाठी देशातील काही शैक्षणिक आणि संशोधन संस्थांना ते प्रदर्शनासाठी पाचारण करतात. त्यांच्या संस्थेबद्दल माहिती देण्यासाठी लागणारी सुविधा आणि जागा त्यांना उपलब्ध करून दिली जाते. त्यामध्ये फंडासव लिबरॅटो या संस्थेचा एक स्टॉल असतोच. याखेरीज इतर काही संस्थांचे स्टॉल असतात. बत्तीसाव्या मोस्ट्राटेकचे वैशिष्ट्य हे की, तेथे दक्षिण धृवावर संशोधन करणाऱ्या संस्थेचा स्टॉल होता. या स्टॉलमध्ये या संशोधनाची सुरुवात कशी झाली यापासून सद्यस्थितीत कोणते संशोधन केले जात आहे याची माहिती दिलेली होती. त्यासाठी त्या संस्थेत काम करणारे संशोधक तिथे आले होते. प्रत्यक्ष संशोधकांकडून माहिती मिळत असल्याने या स्टॉलजवळ सतत गर्दी असायची.



**धृवीय प्रदेशात संशोधन करणाऱ्या संस्थेचा गजबजलेला स्टॉल**

मोस्ट्राटेक ही प्रामुख्याने विज्ञान आणि तंत्रज्ञानाची स्पर्धा असते. असे असले तरी त्यातील प्रत्येक प्रदर्शनीय वस्तूचा विज्ञान किंवा तंत्रज्ञानाशी संबध असलाच पाहिजे असे नाही. विज्ञानाबरोबरच कला क्षेत्राला देखील या प्रदर्शनात सारखेच महत्त्व दिलेले तेथे आढळते. प्रदर्शनात सर्वत्र छान छान चित्रे लावून ठेवलेली असतात. याखेरीज विद्यार्थ्यांनी गोळा केलेल्या वस्तू, त्यांनी बनविलेल्या बाहुल्या, खेळण्या यांनादेखील या प्रदर्शनात स्थान दिलेले होते. काही ठिकाणी तर पेंटिंग्जचेच प्रदर्शन भरविलेले आढळले.



**मुलांनी आणि शिक्षकांनी काढलेल्या चित्रांचे प्रदर्शन**

स्पर्धेत सहभागी विद्यार्थी आपापला प्रकल्प दाखविण्यात गुंतलेले असतात. त्या मानाने त्यांच्यासोबत आलेले शिक्षक मोकळे असतात. या शिक्षकांना कामाला लावण्याची एक चांगली शक्कल आयोजकांनी शोधून काढली. शिक्षकांसाठी विज्ञान व तंत्रज्ञान अध्यापन या

समाजाचा एकच कायदा असतो, तो म्हणजे रुढी. – पी. जी. हॅमरटन

विषयावर एक परिसंवाद आयोजित केला होता. या परिसंवादासाठी देशातील नावाजलेल्या शिक्षणतज्ज्ञांना पाचारण करण्यात आले होते. तेथे आम्ही गेलो होतो. परंतु आमची निराशा झाली. सगळी चर्चा पोर्तुगीज भाषेत चालली असल्याने आम्हाला त्या चर्चेत सहभागी होता आले नाही. परंतु दुसऱ्या चर्चासत्रात मात्र आम्ही हिरिरीने भाग घेतला. हे चर्चासत्र आंतरराष्ट्रीय सभासदांसाठी असून चर्चेचे माध्यम इंग्रजी होते. चर्चेसाठी विषय देखील मनाला भिडेल असाच निवडलेला होता. विषय होता सामाजिक एकोपा (cultural Cohesion). समाजाच्या विविध घटकांत एकोपा नांदण्यासाठी आपल्या देशात कोणते प्रयत्न केले जातात याची माहिती प्रत्येक सभासदाने द्यावयाची होती. पहिले सादरीकरण ब्राझीलचेच होते. शिमारो या चिरुटाने त्या देशातील लोक एकत्र कसे येतात याचे प्रात्यक्षिक त्यांनी करून दाखविले. त्यानंतर इतर देशांच्या सभासदांनी सादरीकरण केले. भारतात सामाजिक सामंजस्य अनेक वर्षांपासून नांदत आहे. त्यामागची कारणे कोणती याचे विश्लेषण सादर करण्याचा मी प्रयत्न केला. डॉ. बेडेकरानी त्यांचे अनुभव सांगून माझ्या सादरीकरणाला हातभार लावला.




**परिसंवादात आपले मत मांडणारी ब्राझिलियन प्रतिनिधी**

प्रदर्शनाच्या शेवटच्या दिवशी बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम दोन भागात करतात. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम प्रदर्शनाच्या ठिकाणीच आयोजित केला होता. मोठ्या मुलांसाठी मात्र हा कार्यक्रम गावातल्याच फीवेल विद्यापीठाच्या सभागृहात (Feevale University Hall) आयोजित केला होता. डोंगरांनी वेढलेल्या या विद्यापीठाचे सभागृह खूप मोठे असून त्यात सर्व आधुनिक सुविधा आहेत. कार्यक्रमाची सुरुवात फंडासाव लिबरॅटो संस्थेच्या बँड पथकाने केली. कानाला गोड आणि मनाला मोहून घेईल असे गीत सादर करून त्यांनी योग्य वातावरण निर्मिती केली.




**फंडासाव लिबेरॅटो संस्थेचा बँड**

बक्षीस वितरणाचा कार्यक्रम बराच वेळ चालला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना वेगवेगळ्या प्रकारची बक्षिसे देण्यात येतात. या कामी ब्राझील देशात काम करणाऱ्या अनेक सरकारी आणि खाजगी उद्योग आघाडीवर आहेत. या उद्योगांच्या वतीने देशातील विद्यार्थी आणि शिक्षकांना अनेक बक्षिसे दिली जातात. या स्पर्धेत जे प्रकल्प सरस ठरतात त्यांना संस्थेच्यावतीने परदेशात स्पर्धेसाठी पाठविले जाते. विशेष म्हणजे त्या विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या मार्गदर्शकांचा जाण्यायेण्याचा खर्च करण्यासाठी अनेक खाजगी कंपन्या पुढे येतात. आंतरराष्ट्रीय सभासदांना मात्र केवळ एक प्रमाणपत्र दिले जाते. भारतातून गेलेल्या दोन्ही मुलांना त्यांच्या उत्तम सादरीकरणासाठी प्रमाणपत्र आणि स्पर्धेचे चिन्ह देण्यात आले.

(पृष्ठ क्र.१९ वर)

समाज हा त्यातील लोकांच्या हितासाठी असतो; लोक समाजाच्या हिताकरिता नसतात. – स्पेन्सर

# स्वदेशवेध-०६ उत्तराखंडाची सहल

*उत्तराखंडाच्या सहलीचे वर्णन या लेखात विशद केले आहे - संपादक*

९ नोव्हेंबर २००० रोजी, भारतीय प्रजासत्ताकाचे २७ वे राज्य म्हणून उत्तरांचलचा जन्म झाला. तात्पुरते दिलेले उत्तरांचल हे नाव जानेवारी २००७ मध्ये बदलवण्यात आले आणि मग आजचे 'उत्तराखंड' हे राज्य निर्माण झाले. ते दोन भागांत वसलेले आहे. वायव्येला गढवाल आणि आग्नेयेला कुमाऊँ. गढवालमध्ये हरिद्वार, डेहराडून, उत्तरकाशी, चामौली, रुद्रप्रयाग, टिहरी आणि पौडी हे सात जिल्हे आहेत. तर कुमाऊँमध्ये उधमसिंगनगर, नैनिताल, अलमोडा, बागेश्वर, पिथौरागड आणि चंपावत असे सहा जिल्हे आहेत. डेहराडून हे राजधानीचे शहर आहे. आमचा सारा प्रवासही बहुतकरून ह्याच जिल्ह्यात झाला. या राज्याच्या उत्तरेस नेपाळ आणि चीन हे देश आहेत, तर दक्षिणेला हिमाचल प्रदेश आणि उत्तर प्रदेश ही राज्ये आहेत. एकूण ५३,४८४ वर्ग किलोमीटर क्षेत्रफळापैकी ३४,४३४ वर्ग किलोमीटर क्षेत्रफळ वनविभाग असलेले हे नैसर्गिक संपत्तीने समृद्ध असे राज्य आहे. सुमारे ९३% भाग डोंगराळ आहे तर केवळ सुमारे ७% भाग सपाटीवर वसलेला आहे.

भागिरथी (गंगा), अलकनंदा, मंदाकिनी, पिंढारी, तोन्स, यमुना, काली, न्यार, भिलंगन, शरयू आणि रामगंगा ह्या नद्या या राज्यातून वाहतात. थोडक्यात काय, तर गंगा-यमुनेच्या खोऱ्यांचे डोंगराळ भागातून मैदानी भागात अवतरण होते तेच हे विख्यात स्थान आहे. गहू, तांदूळ, बार्ली, मका, मंडुआ, हंगोरा इत्यादी पीके इथे घेतली जातात. सफरचंद, लिची, आलुबुखार, नास्पती इत्यादी फळेही इथे होत असतात. चुनखडी,



राज्यपुष्प ब्रम्हकमळ



राज्यपक्षी मोनाल

राज्यवृक्ष बुरांस (ऱ्होडोडेन्ड्रॉन)



राज्यपशु कस्तुरीमृग (मस्क डिअर)



मॅग्नेसाईट आणि जिप्सम ही खनिजे इथे प्राप्य आहेत. इथे कुमाऊँनी, गढवाली आणि हिंदी ह्या भाषा बोलल्या जातात. ह्या राज्याच्या अधिकृत भाषा हिंदी आणि संस्कृत ह्या आहेत. मार्च महिन्यापासून जूनच्या मध्यापर्यंत उन्हाळा असल्याने हाच काळ इथल्या पर्यटनास सोयीचा असतो.

उत्तर हिमालयात सिद्ध, गन्धर्व, यक्ष, किन्नर इत्यादी जातींची सृष्टी असून तिथला राजा कुबेर असल्याचे सांगितले आहे. कुबेराची राजधानी अलकापुरी असल्याचे सांगितले आहे. पुराणांनुसार कुबेराच्या राज्यात ऋषि-मुनी तप व साधना करत असत. म्हणून ह्या क्षेत्रास देव-भूमी किंवा तपोभूमी समजले जाते. उत्तराखंड ही वेद, शास्त्रे व महाभारत जिथे रचले गेले ती पुण्यभूमी आहे.

सुदैवाने अर्वाचिन काळातही उत्तराखंड तपःसाधनेची भूमी बनून राहिलेली आहे. हृषीकेशला आजही योग साधनेसाठी जागतिक राजधानी मानले जाते. स्वामी रामदेव यांचे पतंजली योगपीठ आणि दिव्ययोग मंदिरही उत्तराखंडातच हरिद्वार येथे आहे.

भारतीय प्रशासकीय अधिकाऱ्यांकरिता लाल बहादूर शास्त्री नॅशनल ऍकॅडमी ऑफ ऍडमिनिस्ट्रेशन मसुरी ही संस्था १९५९ मध्ये प्रस्थापित करण्यात आली. भारतातील सर्वात जुनी (१८४७) अभियांत्रिकी संस्था, उत्तराखंडातील रुरकीमध्ये आहे. डेहराडून येथे भारतीय लष्करी अकादमी आहे. मुळात १८७८ मध्ये ब्रिटिश इंपिरिअल फॉरेस्ट स्कूल म्हणून स्थापन झालेली विख्यात संस्था, आज भारतीय वनसंशोधन संस्था म्हणून डेहराडूनमध्ये प्रतिष्ठित आहे. भारतीयांना ज्या शैक्षणिक संस्थांचा अभिमान वाटावा अशा ह्या अग्रगण्य संस्था हल्लीच्या उत्तराखंडातच स्थित आहेत.




लिचीची ही झाडे कॉर्बेट स्मृतीसंग्रहालयासमोरची आहेत.  आळकुड्या आणि रताळी तर आपल्याकडेही मिळतात. पण म्हणून काही त्याची कोणी चाट करून खात नाही! पण तिथल्या अंदाजाने आपल्याला नव्या पाककृती सुचल्या तर हव्याच आहेत.



ह्या देखण्या वृक्षाची 'सिल्व्हर ओक' अशी ओळख पटली आहे. मात्र, उत्तराखंडातील संपूर्ण प्रवासात आम्हाला इथे-तिथे सर्वत्र दिसतच राहिलेली एक कळीची वनस्पती होती हायड्रन्झिया. सदाहरित आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्वाची. मोगऱ्याच्या झाडासारखेच हिरवेगार, बुटके झुडूप. मुळात हिरव्या-पोपटी रंगाच्या कळ्यांचे झुपके, फुलत फुले  मोठी होतात तसतशी पांढरी होऊ लागतात, नंतर उमलत विकसत जात असता त्यांना निळी जांभळी छटा चढू लागते. अशा सर्व अवस्थांतले गुच्छ बाळगणारे झुडूप मग खूपच देखणे दिसू लागते. ह्या झुडुपाला म्हणतात हायड्रन्झिया. ओव्याच्या पानांची आठवण व्हावी इतकी हिरवीगार, कांतीमान, देखणी पाने. जणू उत्साहाचे प्रतीकच. उमलताना पांढुरके होत जाणारे गुच्छ. पुष्पगुच्छ देऊन स्वागत करायचे असेल तर मी हायड्रन्झियाचाच मोठ्ठा गुच्छ पसंत करेन! हिरव्यागार पासून तर निळ्या जांभळ्या ठिपक्यांपर्यंतचे सर्व अवतार एकाच झाडावर.

उत्तराखंड हिरवागार आहे. असंख्य वनस्पतींनी सदाबहार सजलेला असतो. त्यातील काही निवडक वनस्पती, ज्या मला विशेष वाटल्या आणि ज्यांची प्रकाशचित्रे जरातरी बरी काढू शकलो आहे ती इथे देत आहे. ती प्रातिनिधीक आहेत. देवदार वृक्षही (कोनफळाचे झाड, कोनिफरस पाईन) आहेत. गडद



हिरव्या रंगांची सुईसारखी पाने असलेले हे कोनफळाचे वृक्ष, सदाहरित असतात. त्यास महादेवास प्रिय असलेला पवित्र वृक्ष मानतात आणि त्याच्या खोडाचा चंदनाप्रमाणे उपयोगही करतात. उंच वाढणाऱ्या ह्या वृक्षास, वरवर जावे तसतशा आखूड होत जाणाऱ्या क्षैतिज-आडव्या फांद्या असतात. त्यामुळे झाडाचा आकारही दुरून उभ्या कोनासारखाच  दिसतो.





नैनितालचे वैशिष्ट्य हे की, डोंगराच्या खळग्यात वसलेले असूनही तलावावर हवा भरपूर. शिडाची होडी येणे स्वाभाविकच. त्या तशा विहरताना पाहून सहलीचा माहोल आपोआपच निर्माण होत जातो.




नैनिताल सरोवर, नैनादेवी मंदिर, भारतरत्न गोविंद वल्लभ पंत प्राणिसंग्रहालय, रज्जूमार्गाने वर जाऊन दुर्बीणीतून दूरदर्शन इत्यादी प्रेक्षणीय स्थळे नैनिताल गावात आहेत. सारीच स्थळे उत्तम आणि जरूर पाहावीत अशी आहेत. सरोवरातील वल्ह्याच्या नौकेतून मारलेला सुमारे तासभराचा फेरफटका तर अविस्मरणीय. आम्ही सर्वच गोष्टीत खूप रस घेतला. प्राणीसंग्रहालय तर आम्हाला बेहद्द आवडले.

नंतर आम्ही कॉर्बेट राष्ट्रीय अभयारण्य पाहणार होतो. सकाळी नास्ता करून निघाल्यावर जेवायला आम्ही कॉर्बेट जंगलानजीकच्या लि-रॉय हॉटेलात पोहोचलो. सुंदर, स्वच्छ, प्रशस्त आणि सुव्यवस्थित आहे. आम्हाला आवडले. प्रथम बसने आणि मग जिप्सीतून प्रवास करून आम्ही प्रत्यक्ष जंगलाच्या दारात जाऊन पोहोचलो होतो. मला हे जंगल आवडले. त्याच्या वाटेवर दुतर्फा आंबा, लिची इत्यादींच्या बागा होत्या. जंगलात टिटवी, तांबट, मोर, शेखरू तसेच एक स्वर्गीय पक्ष्यांची जोडी दिसली. हे पक्षी कावळ्याहून किंचित लहान, रंगाने शुभ्र पांढरी असलेली लांबलचक (सुमारे दोन फूट) शेपटीवजा पिसे असलेले होते. उडले तेव्हा शेपट्या पतंगाच्या शेपटीसारख्या सळसळत जात असताना दिसल्या. अगदी अद्भूत दृश्य. असेही क्षण बघता

जेव्हा माणसाला योग्य ती व्यक्ती भेटते, तेव्हा खरी मैत्री सुरू होते. - इमरसन

आले म्हणूनच आम्हाला पर्यटनाचे सव्यापसव्य सार्थकी लागले असे वाटले. त्यांचे फोटो मात्र कुणालाच काढता आले नाहीत. चालत्या जिप्सीतून जे केवळ नेत्रच पाहू शकतात ते कॅमेरे कसे बरे टिपू शकतील? असो. केवळ पावसाळ्यात वाहणाऱ्या नद्यांना तिथे 'बरसाती' म्हणतात. अशाच एका कोरड्या ठक्क पडलेल्या बरसातीत आम्हाला मोर दिसला. माकडे आणि हरणे बरीच दिसली. निष्पर्ण झालेली मात्र फळांनी लगडलेली खूप बेलफळाची झाडे दिसली. जंगलभर इथे-तिथे बेलफळे पडलेली दिसत होती. आम्ही सोबतही बरीच उचलून घेतली. त्याचा मुरंबा अतिसारावरचा रामबाण इलाज असतो.




दुसरे दिवशी सकाळी हॉटेल सोडताना, समोरच्याच जंगलात अकल्पितपणे कोल्हा दिसला. आजूबाजूच्या परिसरात इतका मिसळून गेलेला होता की दिसला नाही, दिसला हे नक्की होईपर्यंत तो नाहीसाही झालेला होता. माझ्या तर केवळ एकाच फोटोत कोल्हा ओळखू येतो आहे. त्या दिवशी आम्ही संध्याकाळी ऋषीकेश दर्शन केले. तिथे मंदिरे तर पाहिलीच पण लक्षात राहिला तो लक्ष्मण-झुला. सालोसाल इमानेइतबारे सेवा देणारा, जनावरांमुळे अवघडून बंद होणारा पूल. इथे उल्लेखनीय हे आहे की, १९३० मध्ये जेव्हा शिवप्रसाद तुल्शान बहादूर ह्यांनी आपल्या वडिलांनी म्हणजेच राय सूरजमल झुनझुनवाला यांनी बांधलेल्या आणि १९२४ सालच्या मोठ्या पुरात वाहून गेलेल्या पुलाचा जीर्णोद्धार करत असता, हा सध्याचा पूल बांधला आणि त्यावर लिहिले, 'ह्या पुलावर कधीही पथकर आकारण्यात येणार नाही!' हा होता, जनतेचा पैसा कसा निस्वार्थपणे वापरावा ह्याचा आदर्श दाखला.

त्याच दिवशी संध्याकाळी आम्ही मसूरीला पोहोचलो. मॉलरोडवर फिरायला गेलो असता तिथे केंब्रिज- बुक-स्टॉलमध्ये, 'दर शुक्रवारी विख्यात लेखक रस्किन बाँड बसतात आणि विकत घेतलेल्या आपल्या पुस्तकावर स्वाक्षरी करून देतात' अशी पाटी पाहिली. लगेचच आमच्या बसमधली मुले तिथे गेली. आदित्यने डस्ट ऑन द माऊंटन हे पुस्तक घेतले आणि त्यावर रस्किन साहेबांनी स्वाक्षरी केली.







मसुरीला दुसऱ्या दिवशी स्थलदर्शन होते. केम्प्टी फॉल बघितला. गोंडोल्यातून मजेदार प्रवास केला. मात्र तिथली मुंबईला लाजवेल अशी शरीरास शरीर भिडवणारी गर्दी पाहून मग मुंबईच बरी वाटू लागली. निदान शिस्तीची तरी आहे. गरम-गरम वाफाळते मोमो आणि बालमिठाई खाल्ली.



ज्या स्मितहास्यावर अश्रुबिंदू चमकतो, ते अत्यंत रमणीय नव्हे का? दवावाचून पहाटेला कोठून सौंदर्य! - डब्ल्यू. एस. लँडोर

आता बालमिठाईची गोष्ट सांगावीच लागणार. एका मंदिरात आमची भेट मराठी बोलणाऱ्या तिथल्याच एका नुकतेच लग्न झालेल्या मुलीशी झाली. त्यांचा प्रेमविवाह झालेला होता. तिचा नवरा तिथलाच रहिवासी होता. ती मात्र होती नवी मुंबईची. त्यामुळे आम्हाला मराठी बोलताना पाहून तिला माहेरचेच कुणी आलेत असे क्षणभर वाटले. बोलता बोलता मग असे कळले की, तिथली प्रसिद्ध मिठाई ही बाल-मिठाई म्हणून ओळखली जाते. मग त्या बुक-स्टॉलपाशीच एका दुकानात ती मिळालीही. पेढ्याचा ऐवज चॉकलेटी होईस्तोवर परतायचा, मग त्यावर बारके हलवे जडवून तयार होते 'बाल-मिठाई'. आम्हाला ती आवडली.




परतताना संध्याकाळ झाली होती. रात्र पडू लागली. मॉलरोडवरून हळूहळू परत येत असता थंडी जाणवू लागली. मुंबईसारखेच तापमान असलेली मसुरी मग खऱ्या अर्थाने मसुरी वाटू लागली. थोड्या वेळाने तर, स्वेटर घेऊन निघणाऱ्यांना हसणारे आम्ही, आता अक्षरशः कुडकुडू लागलो होतो. उन्हाळ्यातल्या संध्याकाळची मॉलरोडवर फिरण्याची गंमत, तिथे जाऊनच अनुभवावी अशी आहे. उद्या आम्ही हरिद्वारला निघणार होतो. सकाळी उठताच आम्ही पाहिले की दाराशी पिठ्ठू जमा झालेले. पिठ्ठू म्हणजे पाठीवरून प्रवाशांचे सामान वाहून नेणारे हमाल. आमचे हॉटेल मॉलरोडवर. तिथे बस येण्यास मनाई. मग दूरवरून सामानाची ने-आण करतात हे पिठ्ठू. ६०-७० किलोचे वजन पाठीवर लादून सतत चढ-उतार आणि नागमोडी वळणांनी जाणारा रस्ता, ते रिकाम्या चाललेल्या प्रवाशांहूनही वेगाने पार करत होते. तिथला आवडलेला आणखी एक प्रकार म्हणजे कुल्हडीतला चहा! कदाचित चहातले पाणी मातीत शोषले जाऊन निव्वळ घट्ट चहा. त्यामुळेच चांगला लागत असावा.

मग आम्ही हरिद्वारला गेलो. गंगेचा घाट अलौकिक आहे. तिथल्या पाण्याचा वेग संस्मरणीय आहे. रोज संध्याकाळी सात वाजता हर की पौडी वर गंगा मंदिरासमोर आरती होत असते. पाण्यात दिवे सोडले जातात. ते दूरवर तरंगत जातात. भारतभरातून हजारो-लाखो लोक रोज तिथे जमतात. सगळे बहुधा नवे असतात. तरीही शिस्त, भक्तीभाव आणि देशप्रेम ह्या गोष्टींनी प्रेरित होत्साता, गंगेवरील प्रत्येक यात्रेकरू तिथे उत्साहाने, उमेदीने आलेला असतो. कुठलीही लाजलज्जा न बाळगता, स्त्री-पुरुष सहजपणे तिथे कोणत्याही वेळी स्नान करत असतात. आईला लेकरू भेटते तेव्हा कधीही भेटले तरी प्रेमाचे भरते येतेच. तसेच आम्ही सारे गंगेची लेकरे आहोत. हिंदू आणि मुस्लिम, ब्राह्मण आणि शूद्र, देशी आणि परदेशी, हवशे-नवशे-गवशे सगळेच ह्या सोहळ्याचे साक्षी असतात. हा सोहळा न चुकता रोज साजरा होतो. पाऊस असो, ऊन असो, कुडकुडती थंडी असो; न गंगेच्या प्रवाहास कधी खळ पडला आहे, न यात्रेकरूंच्या उत्साहास. शेकडो, हजारो वर्षे हे असेच चालत आलेले आहे. धन्य ती गंगा आणि धन्य आम्ही तिची लेकरे.

**- नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

# गुप्तकालीन भारत : प्राचीन भारतातील 'सुवर्णयुग'

**भाग : ३**

*प्राचीन काळात इसवी सनाच्या ४ थ्या व ५ व्या शतकात भारतावर राज्य करणाऱ्या सुप्रसिद्ध 'गुप्त' घराण्याविषयी व त्यांच्या राज्यकारभाराविषयी विस्तृत माहिती देणारा लेख - संपादक*

(लेखाचा उर्वरीत भाग मागील अंकापासून पुढे...)

इतिहासकार असे मानतात की, दुसऱ्या चंद्रगुप्तानंतर पहिला कुमारगुप्त सम्राट बनला व त्याने इसवी सन ४१५ ते ४५५ ह्या कालावधी दरम्यान राज्य केले. पहिल्या कुमारगुप्तच्या दोन राण्यांविषयी व दोन पुत्रांविषयी आपणास माहिती मिळते. त्याच्या एका राणीचे नाव अनंतादेवी होते, तर दुसऱ्या राणीचे नाव देवकी असावे असे इतिहासकार सांगतात. पहिल्या कुमारगुप्ताच्या दोन पुत्रांची नावे पुरूगुप्त व स्कंदगुप्त अशी होती. ह्यापैकी पुरूगुप्ताची माता अनंतादेवी व स्कंदगुप्ताची माता देवकी असावी असे अभ्यासकांचे मत आहे.

आपणास पहिल्या कुमारगुप्ताविषयी माहिती मिळण्याचे महत्त्वाचे स्रोत म्हणजे उत्तर प्रदेशातील इटाह जिल्ह्यातील बिलसाड येथे सापडलेला स्तंभलेख व त्याने पाडलेली विविध प्रकारची नाणी होत. समुद्रगुप्त व दुसऱ्या चंद्रगुप्ताप्रमाणे पहिल्या कुमारगुप्तालासुद्धा त्याने पाडलेल्या विविध नाण्यांवर वेगवेगळ्या मुद्रांमध्ये व अवस्थेमध्ये दाखविण्यात आले आहे. उदाहरणच द्यायचे झाले तर विविध नाण्यांवर धनुर्धराप्रमाणे हातात तलवार घेतलेल्या अवस्थेत, अश्वमेध यज्ञ करताना, अश्वारूढ अवस्थेत, सिंहाची शिकार करताना, हत्तीवर आरूढ असताना इत्यादी वेगवेगळ्या अवस्थांमध्ये पहिल्या कुमारगुप्ताचे दर्शन आपणास होते. पश्चिम भारतात चलनासाठी पहिल्या कुमारगुप्ताने चांदीची नाणी पाडली होती असे इतिहासकार सांगतात. चांदीप्रमाणेच त्याच्या काळात तांब्याची नाणीदेखील अस्तित्वात होती असे दाखले आपणास सापडतात. पहिल्या कुमारगुप्ताची नाणी भारताच्या विविध भागांत सापडलेली आहेत. त्याची काही नाणी तर महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात देखील मिळालेली आहेत. साताऱ्यात पहिल्या कुमारगुप्ताची जवळ जवळ एक हजार तीनशे पंच्यान्नव एवढी नाणी सापडली आहेत अशी माहिती आपणास विविध स्रोतांतून मिळते. यावरून पहिल्या कुमारगुप्ताचे साम्राज्य खूप विशाल होते असे म्हणणे वावगे ठरू नये. पहिल्या कुमारगुप्ताविषयी अजून एक महत्त्वाची व रंजक माहिती म्हणजे हा सम्राट विविध नावांनी ओळखला जाई. यापैकी काही नावे पुढीलप्रमाणे आहेत - श्री. महेंद्र, महेंद्रकल्प, श्रीमहेंद्र सिंह, अजीत महेंद्र, सिम, महेंद्र, अश्वमेध महेंद्र, महेंद्र कर्म, महेंद्र कुमार, महेंद्र आदित्य.

पहिल्या कुमारगुप्ताच्या काळात सर्वत्र शांतता व सुबत्ता असावी असा इतिहासकारांचा कयास आहे. काही अभ्यासकांच्या मते पहिल्या कुमारगुप्ताच्या कारकीर्दीच्या शेवटच्या काळात गुप्त साम्राज्यावर आक्रमण झाले असावे व हे आक्रमण नर्मदा नदीचा उगम झालेल्या आसपासच्या प्रदेशातील 'पुष्यमित्र' नामक टोळ्यांनी केले असावे असे काही इतिहासकारांचे मत आहे. नर्मदा नदीच्या उगमस्थानाजवळच्या ह्या प्रदेशास त्याकाळात 'मेकल' (Mekala) प्रदेश असे म्हटले जाई असे संदर्भ काही पुराणांमध्ये सापडतात. विष्णुपुराणात देखील 'पुष्यमित्र' कुळाचा वा ह्या टोळीचा उल्लेख आलेला आहे. काही इतिहासकार ह्या टोळीचे वा कुळाचे नाव 'पुष्यमित्र' नव्हे तर 'युद्धमित्र' असावे असे म्हणतात.

---

तिरस्कारामुळे झालेली जखम स्मितामुळे भरून निघते. - शेक्सपीअर

पहिल्या कुमारगुप्ताच्या कारकीर्दीच्या अखेरीस गुप्त साम्राज्यावर एक मोठे आक्रमण झाले होते असे इतिहासकार म्हणतात हे आपण पाहिलेलेच आहे. सदर आक्रमण 'पुष्यमित्र' नामक टोळ्यांनी केले असावे असा इतिहासकारांचा कयास आहे. हे आक्रमण गुप्त साम्राज्याच्या पश्चिम सीमेवर झाले होते व आक्रमणकर्ते फार प्रबळ व शक्तीशाली होते अशी माहिती आपणास मिळते. मात्र, हे आक्रमण गुप्त राजघराण्याने यशस्वीरित्या परतवून लावले होते व एवढेच नव्हे तर शत्रूचा धुव्वा उडवला होता व हा महत् पराक्रम पहिल्या कुमारगुप्ताचा पुत्र युवराज स्कंदगुप्त याने गाजवला होता. स्कंदगुप्ताच्या ह्या पराक्रमाविषयीची माहिती आपणास एका तत्कालीन शिलालेखावरून मिळते. ह्या शिलालेखाची भाषा काव्यात्मक असून कवीने स्कंदगुप्ताच्या शौर्याचे गुणगाण गायलेले आहे व कवीने स्कंदगुप्ताची केलेली ही प्रशंसा रास्तच आहे यात वाद नाही. कवी म्हणतो की, ह्या लढाई दरम्यान स्कंदगुप्ताने एक रात्र रणांगणावर उघड्या जमिनीवर झोपून काढली होती. स्कंदगुप्ताने अलौकिक व अतुलनीय शौर्याचे प्रदर्शन करून गुप्त साम्राज्यावर आक्रमण करणाऱ्या शत्रूचा नायनाट केला होता. स्कंदगुप्ताच्या ह्या देदीप्यमान कामगिरीमुळे त्याची कीर्ती व लोकप्रियता संपूर्ण साम्राज्यात उदंडपणे वाढली होती. लहानांपासून ते थोरामोठ्यांपर्यंत सर्वचजण स्कंदगुप्ताची स्तूती करत होते. स्कंदगुप्ताच्या ह्या कामगिरीमुळे त्याला आपला पिता पहिला कुमारगुप्ताच्या नंतर गुप्त सम्राट बनणे सुकर झाले असावे असे म्हणणे वावगे ठरू नये.

काही इतिहासकारांचे म्हणणे आहे की, पहिल्या कुमारगुप्ताच्या काळात नाव घेण्याजोग्या महत्त्वाच्या घटना घडल्या नाहीत. असे असले तरी, पहिल्या कुमारगुप्ताने जवळ-जवळ चाळीस वर्षे सुरळीतपणे राज्यकारभार चालविला व त्याच्या पूर्वजांनी स्थापन केलेले विशाल साम्राज्य टिकवून ठेवले ही बाब निश्चितच वाखाणण्याजोगी आहे. पहिल्या कुमारगुप्ताच्या कारकीर्दीचे अजून एक वैशिष्टय म्हणजे त्याने भगवान शिव (शंकर) व पार्वतीमातेचा पूत्र कुमार कार्तिकेय (स्कंदगुप्त) ह्याच्या पूजाअर्चेला महत्त्व प्राप्त करून दिले असा एक मतप्रवाह आहे. त्यामुळेच त्याने त्याचे स्वतःचे नाव कार्तिकेयाच्या नावातील 'कुमार' असे ठेवले वा घेतले असावे असे वाटते. पहिल्या कुमारगुप्ताने पाडलेल्या काही नाण्यांवर गरुडाच्या (भगवान विष्णूचे वाहन) चित्राऐवजी वा प्रतिमेऐवजी मोराचे (स्कंदगुप्त-कुमार कार्तिकेयाचे वाहन) चित्र/प्रतिमा आढळते.

पहिल्या कुमारगुप्ताने घेतलेल्या पदव्यांवरून तो एक समर्थ व प्रबळ राजा होता असे निदर्शनास येते. त्याने घेतलेल्या काही पदव्या पुढीलप्रमाणे आहेत - विजितावतीर अवनीपथ, महीतलम जयती, साक्षादीव नरसिंहो सिंह-महेंद्रो, युद्धी सिंह-विक्रम, गुप्त-कुलामलचंद्रो. ह्या पदव्यांचा अर्थ अतिशय समर्पक असा आहे. विजितावनीर अवनीपथ ह्या पदवीचा अर्थ - 'पृथ्वीपती, ज्याने पृथ्वीला जिंकले आहे असा तो' - असा होतो. 'महीतलम जयती म्हणजे- जो पूर्ण पृथ्वी जिंकतो असा तो'-असा होतो. 'साक्षादीव नरसिंहो सिंह-महेंद्रो' या पदवीचा अर्थ -'विष्णूचा अवतार नरसिंहासारखा असा तो सिंह-महेंद्र'-असा होय. 'गुप्त-कुलामलचंद्रो म्हणजे गुप्तकुलातील डागविरहीत चंद्र असा होय.' 'युद्धी सिंह-विक्रम ह्या बिरुदावलीचा अर्थ 'युद्धामध्ये सिंहासारखा पराक्रम गाजवणारा'-असा होतो.

काही अभ्यासकांच्या मते स्कंदगुप्त व त्याच्या भावांमध्ये सत्तेसाठी संघर्ष झाला असे म्हणणे चुकीचे ठरेल. याऐवजी सर्व राजपुत्रांमध्ये स्कंदगुप्त हा गादीवर येण्याच्या दृष्टीने वा राजा बनण्याच्या दृष्टीने सर्वोत्तम होता असे म्हणणे सयुक्तिक ठरेल असे काही इतिहासकार म्हणतात.

स्कंदगुप्तानंतर पुरूगुप्त हा गुप्त सम्राट बनला अशी माहिती आपणास भिटरी येथे १८८९ साली सापडलेल्या दुसऱ्या कुमारगुप्ताच्या मुद्रेवरून मिळते. भिटरी हे गाव

सध्याच्या उत्तर प्रदेश ह्या राज्यातील गाजीपूर ह्या जिल्ह्यात आहे. ह्या मुद्रेमध्ये पुरूगुप्ताचा उल्लेख पहिल्या कुमारगुप्ताची राणी अनंतदेवी हिच्यापासून झालेला पुत्र असा आलेला आहे. मात्र, आश्चर्याची बाब म्हणजे ह्या मुद्रेत स्कंदगुप्तचा उल्लेख आलेला नाही.

स्कंदगुप्ताने आपल्या पराक्रमाची गाथा आपल्या विधवा झालेल्या आईला सांगितली तेव्हा तिच्या डोळ्यात अश्रू होते असे वर्णन काही इतिहासकार करतात. हे वर्णन करताना स्कंदगुप्ताची भगवान श्रीकृष्णाशी तर त्याच्या मातेची श्रीकृष्णाची माता देवकीशी ही सुंदर अशी कलात्मक तुलना केलेली आढळते. जसे महाभारतातील देवकी आपला पुत्र कृष्णाच्या पराक्रमाची गाथा ऐकून भावनिक होऊन आनंदाश्रू ढाळते. अगदी त्याचप्रमाणे स्कंदगुप्ताची माता आपल्या पुत्राचा पराक्रम पाहून आपल्या डोळ्यातील आनंदाच्या अश्रूंना वाट मोकळी करून देते. स्कंदगुप्ताने पुष्यमित्रांचा नायनाट केल्यानंतरची ही घटना असावी असे इतिहासकार मानतात. स्कंदगुप्ताच्या नाण्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्याच्याकाळात त्याच्या पूर्वजांच्या मानाने सोन्याची नाणी कमी प्रमाणात पाडलेली आढळतात. एवढेच नव्हे तर ही नाणी पाडण्यासाठी वापरलेल्या सोन्याची गुणवत्ता देखील कमी दर्जाची होती असे अभ्यासकांचे मत आहे. यावरून इतिहासकारांनी असे अनुमान काढलेले आहे की, स्कंदगुप्ताच्या काळात गुप्त साम्राज्याच्या शत्रूंचा पाडाव करण्यासाठी मोठ्या प्रमाणात युद्धे व लढाया लढल्या गेल्या व त्यामुळे साम्राजाच्या खजिन्यावर व समृद्धीवर त्याचा विपरीत परिणाम झाला. त्यामुळेच स्कंदगुप्ताच्या काळात सोन्याची नाणी कमी प्रमाणात पाडण्यात आली व जे सोने वापरले गेले त्याची गुणवत्ता देखील कमी दर्जाची होती. अर्थात, स्कंदगुप्ताने अनेक लढाया लढून शत्रूंचा दारूण पराभव केला याचे आपणास इतर अनेक पुरावेदेखील सापडतात.

दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या काळापासूनच आधुनिक गुजराथमधील काठियावाड व सौराष्ट्राचा भाग हा गुप्त साम्राज्याचा हिस्सा बनला होता हे आपण पाहिलेच आहे. ह्याच प्रांतात जगप्रसिद्ध असे सोमनाथ (शिव) मंदिर आहे. तसेच येथील गिरनार पर्वतरांगांमध्ये हिंदूंची तशीच जैनांची पवित्रस्थळे आहेत. गिरनार डोंगरांमध्ये हिंदूंच्या दत्तसंप्रदायाची मंदिरे असून सध्या दत्तसंप्रदायातील अनेक हिंदू गिरनार पर्वतामधील पवित्र स्थळांची तीर्थयात्रा करताना आढळतात. येथील गिरच्या जंगलांमध्येच भारतातील प्रसिद्ध सिंहांची प्रजातीदेखील आढळते. असो. तर आपला मुद्दा असा होता की, विक्रमादित्य दुसरा चंद्रगुप्त याने शकांचा पराभव करून काठियावाड–सौराष्ट्राचा प्रांत जिंकून घेतला होता. तेव्हापासून हा भाग गुप्त साम्राज्याचा घटक होता. ह्याच प्रांतामध्ये प्रसिद्ध मौर्य सम्राट चंद्रगुप्त मौर्य याने सुदर्शन नामक कृत्रिम तळे निर्माण केले होते. हे तळे वा धरण डोंगरांमधून वाहणाऱ्या नद्यांवर बांध टाकून निर्माण करण्यात आल्याचे दाखले आपणास आढळतात. हा बंधारा नंतरच्या काळात शक राजा (क्षत्रप) पहिला रुद्रदमन याच्या काळात दुरुस्त केला गेला होता अशी माहिती आपणास मिळते. त्यानंतर स्कंदगुप्ताच्या काळात हा सुदर्शन वा तळे बंधारा फुटून पूरसदृश्य स्थिती निर्माण झाली होती अशी माहिती मिळते. त्यामुळे स्कंदगुप्ताचा ह्या प्रदेशाचा प्रांताधिकारी प्राणदत्त याने हा बंधारा वा धरण पुन्हा एकदा दुरूस्त केले होते. त्यामुळे येथील लोकांचे भविष्यात येणाऱ्या पूरांपासून तर संरक्षण झालेच, परंतु ह्या प्रदेशात पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध झाले असणार यात वाद नाही.

काही इतिहासकारांच्या मते स्कंदगुप्त हा पहिल्या कुमारगुप्तला त्याच्या पट्टराणीपासून वा मुख्य राणीपासून झालेला पूत्र नसावा. परंतु पराक्रमाच्या बाबतीत स्कंदगुप्त हा इतर राजपुत्रांपेक्षा श्रेष्ठ होता असे म्हणणे वावगे ठरू

नये. स्कंदगुप्ताने सम्राट बनण्यापूर्वी पुष्यमित्रांचे आक्रमण तर परतवून लावलेच होते. परंतु राज्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्याने मध्य आशिया व त्याही पलीकडून म्हणजेच मध्य आशियाच्याही उत्तरेकडून आलेल्या 'हून' टोळ्यांचादेखील दारुण पराभव केला होता. हूनांच्या टोळ्या त्याकाळात अतिशय खुंखार व रक्तपिपासूप्रमाणे युद्ध करणाऱ्या क्रूर टोळ्या वा लोक म्हणून प्रसिद्ध होते. ह्या हूनांच्या टोळ्या पश्चिमेकडे युरोपपर्यंत जाऊन पोचल्या होत्या व त्यांनी मध्य आशिया व युरोपमध्ये अक्षरशः धुमाकूळ घातला होता. एवढेच नव्हे तर त्यांनी युरोपमधल्या प्रबळ अशा रोमन साम्राज्याची सुद्धा झोप उडवली होती. अशा हूनांची एक टोळी गांधार प्रदेशाकडे (आधुनिक पाकिस्तानच्या वायव्येकडील पेशावर खोऱ्याचा तसेच अफगाणिस्तानातील जलालाबाद शहराच्या आसपासचा परिसर. ह्या प्रांताचा उल्लेख महाभारतात देखील येतो व दुर्योधनाचा मामा शकुनी हा गांधारचा राजा होता हे महाभारतात म्हटलेले आहे.) आली व त्यांनी हा प्रदेश जिंकून घेतला व येथे आपली सत्ता प्रस्थापित केली. गांधारमध्ये हूनांनी अमानूषपणे लोकांवर अत्याचार केले. हूनांचे एकंदरीत वर्तन पाहता त्यांचे वागणे आदिम रानटी टोळ्यांसारखे होते असे म्हणणे वावगे ठरू नये. स्कंदगुप्ताने अशा विध्वंसक वृत्तीच्या हूनांचा निर्णायक पराभव करून भारतवर्षावर व भारतीयांवर मोठे उपकार केले होते असे म्हणणे अतिशयोक्ती ठरू नये. याचे कारण जर हूनांचे त्यावेळचे भारतावरील आक्रमण यशस्वी झाले असते तर त्यांनी भारतात देखील धुमाकूळ घालून मोठ्या प्रमाणात कत्तली करून येथील शांततामय व आर्थिक व बौद्धिकदृष्ट्या समृद्ध असलेले जीवन विस्कळीत करून टाकले असते यात वाद नाही.

पराक्रमाच्या बाबतीत आपण स्कंदगुप्ताची तुलना त्याचे आजोबा म्हणजेच 'विक्रमादित्य' दुसरा चंद्रगुप्त व पणजोबा समुद्रगुप्तासोबत केल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. ज्याप्रमाणे दुसऱ्या चंद्रगुप्ताने गुप्त साम्राज्याचे रक्षण शकांसारख्या परकीय टोळ्यांपासून केले अगदी त्याचप्रमाणे स्कंदगुप्ताने गुप्त साम्राज्याचे व भारताचे रक्षण हूनांसारख्या परकीय टोळ्यांपासून केले. रणांगणांवर शौर्य गाजवून शत्रूचा बीमोड करण्याची आपल्या राजघराण्यातील थोर पुरुषांची परंपरा स्कंदगुप्ताने समर्थपणे चालविलेली आपल्या निदर्शनास येते.

आपला पिता दुसरा चंद्रगुप्त याच्याप्रमाणेच पहिला कुमारगुप्त हा सहिष्णू राजा होता. त्यामुळेच पहिल्या कुमारगुप्तच्या काळात शैव पंथीय व वैष्णव पंथीय ह्या दोहोंना अनुक्रमे भगवान शिव व विष्णूची पूजा-अर्चा व उपासना करण्यासाठी कोणतीही आडकाठी नव्हती असे निदर्शनास येते. पहिल्या कुमारगुप्तच्या काळात स्वामी महासेना म्हणजचे कुमार कार्तिकेयेची (भगवान शिव व माता पार्वतीचा पुत्र) उपासना मोठ्या प्रमाणात केली जात असे. बौद्ध धर्मियांच्या धार्मिक भावनांचा देखील पहिल्या कुमारगुप्ताच्या काळात आदर केला जाई.

काही इतिहासकारांच्या मते वारसाहक्काच्या नियमाप्रमाणे पहिल्या कुमारगुप्त नंतर पुरुगुप्त हा गुप्त सम्राट बनायला हवा होता. पुरुगुप्त हा पहिल्या कुमारगुप्तला महादेवी अनंतदेवी ह्या राणीपासून झालेला पूत्र होता. मात्र, सत्तेसाठी भावाभावांमध्ये झालेल्या संघर्षात स्कंदगुप्त विजयी ठरला व आपला पिता पहिल्या कुमारगुप्तनंतर तो गुप्त साम्राज्याचा शासक बनला असे काही अभ्यासक म्हणतात.

जरी सुरुवातीच्या काळात स्कंदगुप्ताचा बराच वेळ व ऊर्जा पुष्यमित्र व हूनांसारख्या शत्रूंसोबत लढण्यात गेला तरी त्याच्या कारकीर्दीच्या पुढील काळात त्याच्या विशाल साम्राज्यात बऱ्याच प्रमाणात शांतता होती असे इतिहासकार म्हणतात. स्कंदगुप्तला त्याच्या प्रशासनात प्राणदत्त, सर्वनाग, चक्रपलित इत्यादी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी चांगल्या प्रकारे मदत केलेली आढळते. स्कंदगुप्तानेदेखील आपल्या पूर्वजांप्रमाणे धार्मिक

सहिष्णूतेचे धोरण अवलंबिले होते. त्याच्या काळात हिंदू धर्माचे विविध पंथ तसेच इतर धर्मियांना आपापल्या परीने धार्मिक उपासना करण्याची मूभा व स्वातंत्र्य होते.

इसवी सन ४६७ मध्ये स्कंदगुप्ताचा कार्यकाल संपला हे म्हणणे आता जवळपास सर्वमान्य झाले आहे. त्याच्या मृत्यूनंतर गुप्त साम्राज्य कमकूवत झाले व त्याचा थोड्याफार प्रमाणात तरी ऱ्हास झाला. हा ऱ्हास प्रामुख्याने पश्चिम भागात झाला असे अभ्यासकांचे म्हणणे आहे. साधारणपणे इसवी सनाच्या सातव्या शतकापर्यंत भारताच्या मध्य व पूर्व भागांमध्ये गुप्त साम्राज्य तग धरून होते याचे लिखीत व पुरातत्वीय दाखले वा पुरावे आपणास आढळतात. इसवी सन ४७७ ते ४९६ या कालावधीत गुप्त साम्राज्याची व्याप्ती पूर्वेकडे बंगालपर्यंत तर पश्चिमेकडे माळव्यापर्यंत होती असे दाखले आपणास सापडतात. यावरून इसवी सनाच्या पाचव्या शतकाच्या अस्तापर्यंतसुद्धा गुप्त साम्राज्य क्षेत्रफळाच्या दृष्टीने विशाल होते असे आपणास म्हणावे लागेल.

''स्कंदगुप्ताने म्लेच्छांवर म्हणजेच गुप्त साम्राज्याच्या शत्रूंवर मिळविलेल्या विजयाची आठवण वा स्मृती ११ व्या शतकातील 'कथासरित सागर' ह्या ग्रंथातील विक्रमादित्याच्या कथेच्या स्वरूपात लेखकाने मांडलेली आहे वा करून दिलेली आहे'' असे काही तज्ज्ञांचे मत आहे. ''कथासरित सागर हा ग्रंथ म्हणजे शैव पंथीय लेखक सोमदेव याने गुनाध्य ह्या लेखकाने 'पैशाची' भाषेत लिहिलेल्या 'बृहतकथा' या ग्रंथाचे संस्कृतमध्ये केलेले भाषांतर होय'' असे काही अभ्यासक म्हणतात.

स्कंदगुप्ताच्या काळात राज्याची प्रशासन व्यवस्था अतिशय कार्यदक्ष होती. प्रशासनाच्या दृष्टीने साम्राज्याचे विभाजन प्रांतांमध्ये केलेले असे व प्रांतांना 'देश' असे म्हटले जाई. प्रांतांच्या म्हणजेच देशांच्या प्रमुख प्रशासकीय अधिकाऱ्यास 'विषयपती' म्हटले जात असे. असेही निदर्शनास आले आहे की, काही वेळा गुप्त सम्राटांचे मांडलिकत्व पत्करलेल्या राजांनासुद्धा प्रांताधिकारी वा 'गोप्त' म्हणून नियुक्त केले जात असे. जिल्ह्याप्रमाणेच शहराचे प्रशासन पाहण्यासाठी 'नगररक्षक' नावाचा अधिकारी नियुक्त केला जात असे. स्कंदगुप्ताच्या काळात गुप्त साम्राज्याच्या पश्चिमेला असलेला 'सौराष्ट्र' (सध्याच्या गुजरातमधील काठियावाड प्रांत) हा प्रांत सांभाळणे फार जिकीरीचे वा कठीण होते. याचे कारण हा प्रांत गुप्त साम्राज्याच्या राजधानीपासून म्हणजेच सत्ता केंद्रापासून फार दूर होता. असे म्हटले जाते की, सध्याच्या उत्तर प्रदेशामधील अयोध्या व काशी ही गुप्त सम्राटांची राजधानी असलेली शहरे होती. सुरुवातीच्या काळापासून गुप्तांची राजधानी पाटलीपूत्र हे शहर होते. परंतु साम्राज्याची व्याप्ती वाढल्यावर वा प्रसार झाल्यावर गुप्त सम्राटांना साम्राज्यातील महत्त्वाच्या शहरांना राजधानीचा दर्जा देणे सयुक्तिक वाटले असावे असे अनुमान यावरून काढावेसे वाटते. ही दोन्ही शहरे हिंदू धर्मियांसाठी फार पवित्र आहेत. अयोध्या व काशी ह्या दोन्ही शहरांचा प्राचीन हिंदू धर्मग्रंथांमध्ये अनेकवेळा संदर्भ येतो. 'अयोध्या' नगरी तर हिंदूंचे लोकप्रिय दैवत श्रीरामाची राजधानी होती. तर 'काशी' नगरीत साक्षात भगवान शिव (शंकर-महादेव) निरंतर वास करतात अशी हिंदू बांधवांची धारणा वा निस्सीम श्रद्धा आहे. असो, सौराष्ट्राला शकांपासून देखील सतत धोका असे. त्यामुळे ह्या प्रांताचे प्रशासन सांभाळण्यासाठी अतिशय विश्वासातील व्यक्तीची नियुक्ती केली जात असे. त्यामुळेच स्कंदगुप्ताने त्याच्या मर्जीतील व त्याला एकनिष्ठ असलेल्या 'प्राणदत्त' नामक अधिकाऱ्याची सौराष्ट्रचा 'गोप्त' तर प्राणदत्तचा पूत्र चक्रपालित याची नियुक्ती सौराष्ट्रची राजधानी गिरीनगर ह्या शहराचा 'नगररक्षक' म्हणून नियुक्त केली होती असे इतिहासकार म्हणतात. प्राणदत्त व चक्रपालित ह्या दोघांनीही स्कंदगुप्ताने त्यांच्यावर टाकलेला विश्वास आपल्या

कामाद्वारे सार्थ करून दाखविला होता यात वाद नाही. ह्याच चक्रपालिताने सुदर्शन तळ्याचा बांध तुटल्यावर तो पुन्हा एकदा व्यवस्थितरित्या बांधून घेतला होता हे आपण अगोदर पाहिलेलेच आहे.

स्कंदगुप्तच्या काळात हिंदूंसोबतच जैन व बौद्ध धर्मियांना देखील चांगली वागणूक दिली जात असे. अभ्यासकांच्या मते स्कंदगुप्त जरी स्वतः हिंदू धर्माचे पालन करणारा असला तरी त्याच्या काळात बौद्ध व जैन धर्मियांना व त्या धर्माच्या भिक्कूंना दानधर्म करण्याची जनतेला व प्रशासकीय अधिकाऱ्यांना मूभा होती व त्यांच्या मते अशा प्रकारे त्याकाळात बौद्धांना व जैनांना दानधर्म केलेले दाखले आढळतात. इतिहासकार असे मानतात की, स्कंदगुप्तच्या साम्राज्याची व्याप्ती पश्चिमेकडे 'सौराष्ट्र' (गुजरात) तर पूर्वेकडे बंगालपर्यंत होती.

स्कंदगुप्तनंतर त्याचा भाऊ पुरुगुप्त (कार्यकाल असवीसन ४६७ ते ४६९. मात्र काही इतिहासकारांच्या मते पुरुगुप्तचा कार्यकाल इसवी सन ४६७ ते ४७३ च्या दरम्यान असावा) हा गुप्त सम्राट बनला असे इतिहासकार मानतात. ह्या पुरुगुप्तचा संदर्भ तिसऱ्या कुमारगुप्तच्या भिटरी येथे सापडलेल्या मुद्रेवरील लेखावरून मिळतो. ह्या मुद्रेवर असे नमूद केलेले आहे की, पुरुगुप्त हा महाराजाधिराज कुमारगुप्त यांचा त्यांची राणी महादेवीपासून झालेला पूत्र होता. पुरुगुप्तच्या मातेचा काही ठिकाणी 'अनंतदेवी' असा उल्लेख येतो.

स्कंदगुप्तच्या निधनानंतरचा गुप्त राजघराण्याविषयी आपणास धूसर माहिती मिळते. पुरुगुप्तानंतर त्याचा पुत्र नरसिंहगुप्त हा गुप्त साम्राज्याचा सम्राट बनला असे अनेक इतिहासकारांचे मत आहे. येथे आपणास एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, विविध मुद्रांमध्ये व शिलालेखांत स्कंदगुप्त व पुरुगुप्तनंतरच्या गुप्त सम्राटांच्या वंशावळीविषयी वेगवेगळी माहिती मिळते. स्कंदगुप्ताच्या पश्चात गुप्त साम्राज्याला उतरती कळा लागण्यास सुरुवात झाली असावी असे अभ्यासक म्हणतात. स्कंदगुप्तचा कार्यकाल फार मोठा असल्यामुळे त्याच्या पश्चात जेव्हा पुरुगुप्त सम्राट बनला तेव्हा पुरुगुप्त हा वृद्धात्वाकडे झुकलेला असावा असेही मत अनेक अभ्यासकांनी मांडले आहे. असे म्हटले जाते की, पुरुगुप्ताचे तत्कालीन प्रसिद्ध बौद्ध प्रचारक वसुबंधू यांच्यासोबत फार चांगले संबंध होते व पुरुगुप्ताने आपल्या राण्यांना व रात्रपुत्राला शिकविण्यासाठी वसुबंधूची नियुक्ती केली होती.

प्राचीन भारताच्या काही इतिहासकारांनी असे विवेचन केले आहे की, तिसऱ्या कुमारगुप्ताच्या भिटरी येथे सापडलेल्या मुद्रेनुसार व विष्णुगुप्ताच्या नालंदा मुद्रेवरील लेखावरून पुरुगुप्तानंतर नरसिंहगुप्त गुप्त साम्राज्याचा सम्राट बनला. तर काही साधनांनुसार पुरुगुप्तनंतर बुद्धगुप्त हा गुप्त सम्राट बनला. सारनाथ येथे सापडलेल्या बुद्ध प्रतिमा शिलालेखावरून दुसरा कुमारगुप्त हा पुरुगुप्तानंतर सम्राट बनला अशा स्वरुपाची माहिती आपणास मिळते. परंतु राधा कुमुद मुखर्जी यांनी आपल्या 'द गुप्ता एम्पायर' (The Gupta Empire) ह्या ग्रंथात पुरुगुप्तानंतर दुसरा कुमारगुप्त हा गुप्त साम्राज्याचा शासक बनला असे मत मांडले आहे.

काही अभ्यासकांच्या मते दुसऱ्या कुमारगुप्तानंतर पुरुगुप्ताचाच पुत्र बुद्धगुप्त हा सम्राट बनला व त्याने जवळ जवळ वीस वर्षे राज्य केले. बद्धगुप्त गादीवर येईपर्यंत गुप्त साम्राज्य प्रबळ होते व त्याच्या कारकीर्दीपासून गुप्त साम्राज्याचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली असे इतिहासकारांचे मत आहे. गुप्त सम्राटांच्या अनेक मांडलिक राजांनी याच काळात आपले स्वातंत्र्य घोषीत करण्याची तर काही राजांनी 'महाराजा' अशी पदवी घेण्याची सुरुवात झाली व वायव्येकडून हून तर दक्षिणेकडून वकाटक राजघराण्यांकडून असणारा धोका बुद्धगुप्तच्या आटोक्याबाहेर होता.

बुद्धगुप्तच्या मृत्यूनंतर गुप्त राजघराण्यात अंतर्गत

झोप, संपत्ती आणि आरोग्य यांचा खरा खुरा उपभोग घ्यावयाचा असेल,
तर त्यात व्यत्यय आला पाहिजे. – रिचर

वादंग निर्माण झाल्याचे आढळते व त्यामुळे देखील गुप्त साम्राज्यावर ह्या काळात हूनांनी आक्रमण केले असावे असे काही अभ्यासक म्हणतात. बुद्धगुप्तानंतर त्याचा भाऊ दुसरा नरसिंहगुप्त हा गुप्त सम्राट बनला व त्याच्यानंतर त्याचा पुत्र व नातू गादीवर आला. हे सर्वजण इसवी सनाच्या सहाव्या शतकाच्या पूर्वाधापर्यंत राज्य करत होते असे इतिहासकार म्हणतात. परंतु ह्याच काळात विनयगुप्त व भानुगुप्त हे राजेदेखील अस्तित्वात होते व ते अनुक्रमे पूर्व व पश्चिम भागावर राज्य करत होते असे अभ्यासकांचे मत आहे. यावरून काही तज्ज्ञांनी असे अनुमाने काढले आहे की, नंतरच्या काळात गुप्त साम्राज्याचे विभाजन होऊन त्याचे रूपांतर लहान लहान राज्यांमध्ये झाले असावे व ह्या विविध राज्यांवर गुप्त घराण्यातील वेगवेगळ्या राजांचे राज्य असावे. अगोदर नमूद केल्याप्रमाणे ह्या नंतरच्या काळातील गुप्त राजांविषयी फार कमी प्रमाणात माहिती मिळते. भानुगुप्त, जो गुप्तांच्या पश्चिमेकडील भागावर राज्य करत होता. त्याला 'हून' टोळ्यांच्या आक्रमणास तोंड द्यावे लागले होते. भानुगुप्तने 'हून' राजा तोरमन याच्याशी युद्ध केले होते असे इतिहासकार म्हणतात. ह्याच काळात हूनांनी गुप्त साम्राज्याचा अविभाज्य घटक असलेला 'माळवा' प्रांत जिंकून घेतला होता. हून राजा तोरमन याचा पुत्र व वारस मिहीरकुल याने तर मगधच्या सीमेपर्यंत मजल मारली होती व गुप्त सम्राट दुसरा नरसिंहगुप्त याला खंडणी वा नजराणा देण्यास भाग पाडले होते. परंतु नंतर नरसिंहगुप्तने आपल्या मांडलिक राजांच्या सहाय्याने मिहीरकुलला हरविण्यात यश मिळविले होते. परकीय हून टोळ्यांविरोधात हा विजय प्राप्त करून देखील दुर्दैवाने नंतरच्या काळातील गुप्त सम्राटांना फुटीरवादी प्रवृत्तींना आळा वा आवर घालण्यात व साम्राज्याचे विघटन थांबविण्यात यश मिळाले नाही. यशोधर्मनने माळव्यात स्वतंत्र राज्याची स्थापना केल्याचे आपल्या निदर्शनास येते. तिसरा कुमारगुप्त व विष्णूगुप्त हे गुप्त राजघराण्यातील शेवटचे सम्राट होते व त्यांच्या काळापर्यंत एकेकाळी विशाल व वैभवशाली असलेल्या गुप्त साम्राज्याचे रूपांतर अतिशय छोट्या राज्यात झाले होते व इसवी सन ५७० पर्यंत प्राचीन भारतातील हे प्रबळ साम्राज्य इतिहासजमा झाले होते. येथे एक बाब लक्षात घ्यायला हवी ती म्हणजे आपणास वेगवेगळ्या स्रोतांतून गुप्तांबाबतची विविध प्रकारची माहिती मिळते. त्याचप्रमाणे नवनवीन पुरातत्वीय साधने सततपणे सापडत असल्यामुळे प्राचीन काळातील इतिहासाबाबत काहीवेळा संभ्रमात वा गोंधळात टाकणारी माहिती मिळत असते. गुप्त राजघराण्याबाबत आपणास काहीवेळा अशीच संभ्रमात टाकणारी माहिती मिळते. काही अभ्यासकांच्या मते गुप्त राजघराण्यातील व्यक्ती हर्षवर्धनाच्या काळात तसेच त्यानंतरही १२ व्या व १३ व्या शतकापर्यंत हयात होत्या व छोट्या-छोट्या राज्यांवर राज्य करत होत्या.

आपण भारतीय इतिहासाचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, भारतावर प्राचीन काळापासून अनेक परकीय सत्तांनी व टोळ्यांनी हल्ला केलेला आहे. प्राचीन काळाचा विचार केला तर इसवी सन पूर्व काळात पर्शियन व ग्रीक लोकांनी भारतावर आक्रमण केलेले आढळते. जगप्रसिद्ध ग्रीक सम्राट सिकंदर (सिकंदरला इंग्रजीमध्ये Alexander 'अलेक्झांडर' असे संबोधले जाते) याने इ.स. पूर्व काळात भारतावर केलेले आक्रमण सर्वज्ञातच आहे. प्राचीन भारतातील इसवी सन पूर्व काळातील मगधचा सुप्रसिद्ध सम्राट, चंद्रगुप्त मौर्य याच्यासोबत एशिया मायनर (Asia Minor) ह्या प्रदेशावर राज्य करणाऱ्या सेल्युकस निकेटॉर ह्या ग्रीक राजाने राजनैतिक संबंध प्रस्थापित केलेले असल्याचे निदर्शनास येते. मेगास्थनिस हा ग्रीक राजदूत चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारात होता अशी माहिती आपणास मिळते. याच मेगास्थनिसने 'इंडिका' हा प्रसिद्ध ग्रंथ लिहिला होता. ह्या गंथावरून आपणास मौर्यकालीन राज्यव्यवस्था,

सामाजिक व आर्थिक जीवन इ. बाबत माहिती मिळण्यास मदत होते. दुर्दैवाने ह्या ग्रंथाचा बराचसा भाग गहाळ झालेला आहे. त्यामुळे इतिहासकारांच्या दृष्टीने व इतिहास लेखनाच्या दृष्टीने हे फार मोठे नुकसान झाले आहे.

ग्रीकांप्रमाणेच पर्शियन लोकांनीसुद्धा इ.स. पूर्व काळात भारतावर आक्रमण केले होते. पर्शियन सम्राट पहिला डारियस याने इ.स. पूर्व काळात भारतावर आक्रमण केलेले निदर्शनास येते. गुप्त काळात देखील 'हून' (Huna) ह्या मध्य आशियातील चीनच्या वायव्य पश्चिम सरहद्दीवर राहणाऱ्या भटक्या टोळ्यांनी भारतावर आक्रमण केले होते. हूनांचे हे आक्रमण सुरुवातीस स्कंदगुप्ताने यशस्वीरित्या परतवून लावले होते व नंतरच्या काळात भानूगुप्तला व दुसऱ्या नरसिंहगुप्तला हूनांच्या आक्रमणास तोंड द्यावे लागले होते. ह्या 'हून' टोळ्या जगाच्या इतिहासात फार विध्वंसक म्हणून प्रसिद्ध आहेत. ह्या टोळ्यांनी पर्शिया व युरोपातदेखील उन्माद घातला होता व जेथे जातील तेथे नासधूस करून लोकांची कत्तल केली होती असे इतिहासकार म्हणतात. त्यामुळेच स्कंदगुप्त व दुसऱ्या नरसिंहगुप्ताने अशा खुंखार व विध्वंसक वृत्तीच्या टोळ्यांचा पराभव करून भारतवर्षाला एका मोठ्या विनाशापासून वाचवले होते असे म्हणणे वावगे ठरू नये. (क्रमशः)

**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

•••

(पृष्ठ क्र. ६ वरून – **बत्तीसावी मोस्ट्राटेक स्पर्धा**)




**प्रमाणपत्र आणि भेटवस्तूसह भारतीय विद्यार्थी**

मोस्ट्राटेक स्पर्धेत विद्या प्रसारक मंडळ तिसऱ्यांदा सहभागी झाले. याआधीच्या सहभागाप्रमाणेच यावेळेस देखील खूप नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. दोन्ही विद्यार्थ्यांच्या दृष्टीने ही पहिलीच परदेशवारी होती. त्यांनी या संधीचा पुरेपूर फायदा करून घेतला. आपला प्रकल्प त्यानी जीव लावून सादर केला. त्याचबरोबर इतर विद्यार्थ्यांनी आणलेले प्रकल्प त्यांनी बारकाईने पाहिले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे जगाच्या वेगवेगळ्या भागातून आलेल्या विद्यार्थ्यांशी त्यांचा संपर्क आला. या संपर्कातून त्यांना बऱ्याच नवनवीन बाबी शिकता आल्या. या स्पर्धेतून मिळणारा फायदा बघता महर्षी परशुराम आभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थिही या स्पर्धेत दरवर्षी सहभागी होतील अशी आशा बाळगू या.

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण–शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे – ४२१२०४

•••

झोपाळू लोक फार सुखी, कारण ते लवकरच निद्रेच्या आधीन होतात! – नित्शे

# चरित्रलेखनाबाबत...

*चरित्र म्हणजे काय? त्याचे स्वरूप कसे असते? त्याचा हेतू कोणता असतो? ऑक्सफर्डच्या शब्दकोशात म्हटले आहे, 'चरित्र म्हणजे एका व्यक्तीच्या जीवनाचा इतिहास असतो.' पूर्वी होऊन गेलेल्या आदरणीय व्यक्तीचे गुणवर्णन करून तिची स्मृती कायम राहावी, पुढच्या पिढ्यांनी योग्य तो बोध घ्यावा, हा हेतू त्या लेखनाचा असतो. 'वाटे चरित्र त्यांचे आपण काही तरावया गावे' या वचनाचा अर्थ स्पष्ट आहे. ही एक अवघड कला आहे. अभ्यासाने ती साध्य होऊ शकते. त्याबाबत थोडेसे... – संपादक*

एकच मनुष्य निरनिराळ्या लोकांशी निरनिराळ्या पद्धतीने वागतो. त्याच्या व्यक्तित्वाच्या वेगवेगळ्या बाजू तो प्रत्येक वेळी दाखवत असतो. मित्रमंडळींत अत्यंत मोकळेपणाने वागणारा एखादा माणूस घरच्या मंडळींशी अगदी तुसडेपणाने वागताना दिसतो, तर घराबाहेर अत्यंत गंभीरपणे वागणारा माणूस घरात अगदी दिलखुलासपणे वागताना दिसतो.

सम्राट नेपोलियन हा अतिशय धाडसी, कठोर आणि भयप्रद माणूस होता. त्याचा चरित्रकार एमिल लुडविग याने लिहिलेले त्याचे चरित्र हे जगातील सर्वश्रेष्ठ चरित्रग्रंथांपैकी एक आहे. नेपालियनच्या खासगी पत्रव्यवहाराचा त्याने भरपूर उपयोग केला असून त्याच्या जीवनावर आणि स्वभावावर प्रकाश टाकला आहे. रणांगणावर अर्धेअधिक आयुष्य घालविलेल्या या रणझुंजार चक्रवर्तीला स्त्रीमोहाने किती पछाडले होते, हे त्याच्या पत्रसंग्रहावरून लक्षात येते. जोसेफाईन ही त्याची पत्नी. तिला त्याच्याबद्दल फारसे आकर्षण वाटत नसावे. युद्धाच्या रणधुमाळीतही तो तिला जवळजवळ रोज एक पत्र पाठवत असे! तिच्याकडून मात्र क्वचितच उत्तर येत असे. त्याच्या विरह व्याकुळतेचा नमुना –

'मला आता तुझा वियोग अगदी असह्य झाला आहे. तू लवकरात लवकर इकडे निघून ये.

मला पत्र का पाठवत नाहीस? तुझे माझ्यावर प्रेमच नाही, असे मला आता वाटू लागले आहे... '

आणि

'तुला मात्र माझी मुळीच आठवण येऊ नये, याला काय म्हणावे? तुला आकर्षून घेण्याइतके सौंदर्य माझे नाही, हा काय माझा दोष आहे?मी तुझ्याकडून प्रेमाची अपेक्षा तरी का करावी?'

एकदा त्याला त्याच्या खासगी गुप्तहेराने सांगितले की, राणीसरकार दुसऱ्या कुणा दरबारी अधिकाऱ्यासोबत राहात असते. अर्थात नेपोलियन प्रचंड भडकला. तेव्हा त्याचा एक युद्धाधिकारी म्हणाला, 'आपल्यासारख्या थोर सम्राटाने या गोष्टीला किती महत्त्व द्यायचे? यापेक्षा आपले यश, आपली कीर्ती यांना जास्त महत्त्व आहे.' हे ऐकून सम्राट म्हणाला, 'कीर्ती? काय उपयोग आहे तिचा? माझ्या प्रियेच्या प्रेमापुढे सगळे जग तुच्छ वाटते.' हे सत्य होते.

एकदा घोडदौड करत असताना त्याच्या खिशातील तिच्या फोटोची काच फुटली. तेव्हा तो उद्गारला, 'अरेरे! काय हा अपशकुन! ती आजारी आहे की, संकटात सापडली आहे कोण जाणे...' असा हा भोळा! पत्नीपेक्षाही त्याचे आईवर अधिक प्रेम होते.

एकदा एक युद्ध जिंकून तो पॅरिसला परतला. आईला स्वतंत्र महाल दिलेला होता. तिला भेटला. तेव्हा ती म्हणाली, ''किती वाळलाएस रे तू! इतके कष्ट कशाला करतोस? पुरे झाल्या तुझ्या लढाया...''

आपण झोपेत असताना परमेश्वर आपल्या दिव्याच्या वाती कातरत असतो. – ए. बी. अलकॉट

''मला काय झालंय? तुझी तब्येत मात्र खराब झालीए. तुझं काही बरं वाईट होऊ नये. नाही तर मला धाक दाखवणारं कुणी उरणार नाही.''

सारांश, खासगी जीवनातील अशा हृदयस्पर्शी प्रसंगांनी चरित्रनायकाच्या जीवनाला जो उठाव येतो, तो त्याने केलेल्या यशस्वी युद्धाच्या वर्णनाप्रमाणेच महत्त्वपूर्ण ठरतो. मनुष्य स्वभावाला विविध बाजू असतात. तो जन्मभर एकसारखाच राहील असे नाही. वयानुसार बदल होतातच. हे लक्षात घेतले, तर चरित्रग्रंथाला एकांगीपणा येत नाही.

लिटन स्ट्रॅची याने लिहिलेल्या 'इमिनंट व्हिक्टोरियन्स' या ग्रंथात फ्लॉरेन्स नाइटिंगल या जगत्‌विख्यात स्त्रीचे चरित्र आहे. क्रिमियाच्या युद्धात हिने केलेली सैनिकांची सुशुषा, परिश्रम आणि त्याग इतिहासात वाचायला मिळतो. ती रोग्यांशी फारच नम्रपणे, प्रेमाने वागायची, तशी इतरांशी वागत नसे. पुढे पुढे तिचा स्वभाव चिडखोर झाला. तिरसटपणामुळे विक्षिप्तपणे वागायची. शास्त्रज्ञांच्या जंतुविषयक उपपत्तींवर, शोधांवर तिचा विश्वास नव्हता! खुल्या हवेचे तिला इतके वेड की, ब्रिटन असो वा तुर्कस्थान, रुग्णालयातील खिडक्या सतत उघड्या ठेवायलाच हव्यात, हा तिचा कडक नियम होता. स्ट्रॅचीने हा ग्रंथ लिहिताना तिच्यातील देवत्वही रंगवले आहे आणि मनुष्यत्वही. अनुभव आणि सत्यकथन यांची सांगड घालताना चरित्रलेखनाची शास्त्रीय बाजू समजून घ्यावी लागते आणि उपलब्ध संदर्भ साहित्याचा अभ्यास करून चरित्राची कलात्मक मांडणी करावी लागते. इतिहासकाराप्रमाणे चरित्रकार संशोधकवृत्तीचा असायला हवा. पत्रसंग्रह हे लेखनाचे एक प्रमुख साधन असल्याने त्यांचा धांडोळा घेणे अपरिहार्य ठरते. दुसरे साधन म्हणजे दैनंदिनी. भारतात अन् विशेषतः मराठीत रोजनिशी नियमितपणे वर्षानुवर्षे लिहिणारी मंडळी सहसा आढळत नाहीत. ल. रा. पांगारकर हे एक सन्माननीय अपवाद. १८९४ पासून त्यांना हा छंद जडला. सुमारे ४० वर्षे ते डायऱ्या लिहित होते. त्यांच्या आत्मचरित्राचे नाव आहे 'चरित्रचंद्र'. ते वाचताना त्यातील तपशील फार मनोवेधक आहेत. याउलट साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी तीन खंडांत 'लो. टिळकचरित्र' लिहिताना त्यांच्या 'गतगोष्टी' या भल्यामोठ्या आत्मचरित्रात म्हटले आहे की, 'लोकमान्यांचे चरित्र लिहितेवेळी पत्रे आणि रोजनिशा यांच्या अभावामुळे होणाऱ्या लेखनाची अपूर्णता मला चांगलीच कळून आली.'

पत्रे, दैनंदिनी याबरोबरच जर चरित्रनायकाच्या आठवणी इतर संबंधितांनी लिहून ठेवल्या, तर त्यांचा चांगलाच उपयोग होतो. बहुतेक सर्व आठवणी प्रत्यक्ष भेटीतूनच निर्माण होत असल्यामुळे नायकाचा खरा स्वभाव त्यातच उमटलेला असतो. अर्थात एक प्रश्न इथे निर्माण होतो, तो विश्वसनियतेचा. म्हणजे असे की, आंद्रे मोर्वा याने विश्वविख्यात कवी लॉर्ड बायरन याचे उदाहरण दिलेले आहे. आपल्या एका प्रेयसीला (तशा त्याला अनेक जिवलग मैत्रिणी होत्या!) लिहिलेल्या पत्रात तो म्हणतो, 'तुझ्यावर माझे किती प्रेम आहे म्हणून सांगू! मी जगतो आहे फक्त तुझ्यासाठी. माझे जीवन, माझे भवितव्य तुला अर्पण केले आहे..' हे प्रेमपत्र म्हणजे प्रेमभावनांचा धबधबाच आहे.

त्याचवेळी त्याने आपल्या मित्राला (बहुधा कवी शेले याला) पत्रात म्हटले आहे, 'काय हे दळभद्री जगणे आहे माझे! फालतू अन् नखरेल बाईची स्तुती करण्याची माझ्यावर दुर्दैवी वेळ आल्याने मी फार वैतागलो आहे. यापेक्षा मोठी अधोगती दुसरी नाही...'

आता जर चरित्रलेखकाला एकच पत्र मिळाले, तर चरित्रातून चुकीचा संदेश जाऊ शकतो. तसेच माणसे दोन प्रकारच्या दैनंदिनी लिहितात. एक गुप्त आणि

दुसरी कुणीही वाचावी अशी. व्यापाऱ्याच्या जशा दोन खतावण्या असतात, तसा हा प्रकार! दोघांच्याही गुप्त गोष्टी बाहेर आल्या तर दोघांनाही मोठी किंमत चुकवावी लागेल ही भीती असतेच! (व्यापाऱ्याला 'करा'ची भीती)

आठवणी लिहिणारे लोक बहुतेक देवपूजा करावी तशी व्यक्तिपूजा करतात. प्रत्यक्ष घडलेल्या प्रसंगांत थोडे बदल करून त्यात मनोरंजक मसाला घातला जातो. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे भक्त त्यांच्या स्पष्टवक्तेपणाबद्दल कौतुक करतात, तर जे तटस्थ अभ्यासक आहेत ते म्हणतात – 'माणूस भलताच उद्धट अन् खडूस होता.'

थोडक्यात काय, चरित्रसाधनांतून सत्य शोधून काढणे फारच कठीण असते. त्या साधनांचे पृथःकरण कसे करणार? इथे तर्कशास्त्र दुबळे ठरते. यासाठी चिकित्सकवृत्ती आणि प्रतिभाकौशल्य यांच्या आधारे चरित्रलेखन करावे हे उत्तम!

आता चरित्राची कलात्मक मांडणी कशी करतात हा प्रश्न उभा ठाकतो. वाचकांची उत्कंठा कायम ठेवणे, हे जसे कथाकाराला आवश्यक, तसेच चरित्रकारालाही आवश्यक असते. चरित्ररचना करताना नायकाचा जीवनपट कालक्रमानुसार कथारूपाने सांगितल्यास कादंबरीप्रमाणे त्याची गोडी कायम राहते. अनावश्यक गोष्टींचा भरणा टाळून नायकाचे व्यक्तिचित्र खरेखुरे रेखाटण्यासाठी आवश्यक गोष्टींची, प्रसंगांची निवड करून लेखकाने तारतम्य साधायला हवे. नायकाच्या गुणावगुणांचा प्रादुर्भाव आणि विकास होण्यास ज्या कित्येक अनुकूल किंवा प्रतिकूल व्यक्ती आणि घटना कारणीभूत होतात, त्यांचे यथास्थित वर्णन केल्यास ते चरित्र निश्चितच वाचक प्रिय होऊ शकते.

भाषाशैलीला ललितसाहित्यात फार महत्त्व आहे. सहज, खेळकर वर्णनशैली हीसुद्धा चरित्रलेखनात गरजेची असते. स्ट्रेचीने लिहिलेले डिझराएलीच्या जीवनात फुलांचे प्रतीक आहे, ते असे :

'त्याला फुलांचे फार वेड होते. प्रिमरोझ अत्यंत आवडती फुले. आधी आधी त्याच्या बहिणीने त्याला फुले देऊन ही आवड निर्माण केली. पुढे लग्न झाल्यावर त्याच्या पत्नीने बागेत फुले लावली. त्या फुलबागेतील सुगंधी फुले ती रोज सकाळी फुलदाणीत सजवून ठेवायची. तो ब्रिटनचा पंतप्रधान झाला, तेव्हा व्हिक्टोरिया राणीकडून त्याला फुले पाठवण्यात येऊ लागली.

... शेवटी तो ख्रिस्तवासी झाल्यावर त्याची फुलांची आवड लक्षात घेऊन राणीने त्याच्या समाधीवर प्रिमरोझ फुले वाहिली.

... आणि पुढे त्याच्या अनुयायांनी त्याच्या स्मरणार्थ जी संस्था स्थापन केली तिचे नाव ठेवले, 'प्रिमरोज सोसायटी'.

अशा प्रतिकाप्रत्मक निवेदन शैलीतून चरित्रकाराचे लेखनकौशल्य ग्रंथाची प्रतिष्ठा वाढवते. अर्थात कल्पनेचा वापर केलाच तर फार जपून करावा लागतो. ही कला प्रचंड कष्टसाध्य आहे. निर्भिडपणे सत्य जगासमोर मांडण्याचे धाडस लेखकात असेल, तर ते चरित्र अधिक चित्तवेधक ठरू शकते. हे कार्य आयुष्यभर करावे लागते. व्हिक्टोरिया राणीचे चरित्र लिहिताना स्टॅचीने सुमारे ९० पुस्तके वाचली होती. हा अभ्यास करताना असंख्य अडचणी येतात. कार्लाइलने म्हटले आहे, 'सुंदर जीवनचरित्र लिहिणे हे प्रत्यक्ष सुंदर जीवन जगण्याइतकेच कठीण आहे.'

स्ट्रॅचीने कवी शेलेबद्दल लिहिताना पाण्याचे प्रतीक मनोवेधकपणे मांडले आहे, ते असे –

(पृष्ठ क्र. ३९ वर)

सद्गुणी माणसाला मधुर निद्रेचा लाभ होतो. – ॲडिसन

# स्वयंसिद्धा

*ही कथा आजच्या काळातील वास्तवता दर्शवते आहे. भारताचा विकास झपाट्याने होतोय पण तो आधी माणसांच्या मनातून होणे आवश्यक आहे. - संपादक*

दरवाजा उघडताच सीमा जोरात ओरडली, 'अहो! सोडा तिला, द्या तिला माझ्याकडे काय केलंय तुमचं? त्या इवलुश्या जीवाने.'

रडत रडत सीमाने आपल्या लहान दोन महिन्यांच्या बाळाला नवऱ्या हातून ओढून घेतलं. ती कळवळून म्हणाली, 'तिला पाण्याने भरलेल्या एवढ्या मोठ्या ड्रममध्ये टाकायला निघालात! त्या निष्पाप मुलीचा जीव घेणार का तुम्ही! आणि, आणि तुम्ही दारुपण प्यायली, का बरं असं वागता? ही तुमची तिसरी वेळ आहे.'

'अगं, नाही गं! सीमा तुझा काहीतरी गैरसमज होतोय. तुझा डोळा लागला होता. म्हटलं, खेळवावं तिला, म्हणून मी तिला पाणी जवळून दाखवत होतो.'

हां, पण तू जर मला पहिलाच मुलगा दिला असता तर... 'अहो! तुम्ही तर शिकलेले आहात. बिझनेसमन आहात. आत्ताच्या काळात मुलगा मुलगी भेद काय करता?'

'तोंड बंद कर तुझे' जोरात सुजय ओरडला हिच्यामुळे, या कार्टीमुळे माझ्या बिझनेसमध्ये माझं नुकसानं झालं आहे.'

'तू आणि ही माझ्यासमोरून चालत्या व्हा नाहीतर आज मी तिला सोडणारच नाही.' तो त्या लहान बाळाला खेचू लागला. सीमा पुन्हा जीवाच्या आकांताने ओरडली, 'सोडा माझ्या सोनूला सोडा.' तेवढ्यात मोबाईलची बेल वाजते. 'एक मिनिट थांब फोन घेतो, महत्त्वाचा फोन आहे. त्या कार्टीचा आवाज बंद कर.' त्या दोघांच्या झटापटीत शांत झोपलेली 'परी' उठली व रडू लागली.

तिला शांत करायच्या बहाण्याने, घाबरलेली सीमा आपल्या दोन महिन्यांच्या सुंदर लेकीला घेऊन घराबाहेर पडते. गावाच्या यात्रेनिमित्त सांगलीतील छोट्याशा गावात म्हणजे तिच्या सासरी आली होती. मुंबईतच जन्म झाल्यामुळे गावाकडची नीटशी तिला माहिती नव्हती. लग्न होऊन नुकतीच दोन वर्षे झाली होती. चालता चालता झर्रकन सीमाच्या डोळ्यांसमोरून सर्व भूतकाळ आला. थोड्याच वेळात ती भानावर आली.

तरीसुद्धा तान्ह्या लेकीचा जीव वाचविण्यासाठी ९.३०च्या सुमारास ती घराबाहेर पडली. गावाकडे लोक या दरम्यान झोपतात. अशा या रात्री ती एकटी घाबरलेली, हातात गडबडीत घेतलेली छोटी पर्स आणि दुपट्ट्यामध्ये गुंडाळलेली तिची तान्ही लेक.

समोर आलेल्या एस.टी.मध्ये काही न विचार करताच बसली. जेणेकरून सुजय तिला पकडून घरी मारहाण नको करायला. पर्स उघडून पाहते तर काय! फक्त १००रु.ची नोट आणि काही सुट्टे पैसे. आपल्या माहेरी कसे जावे बरं. रात्रीची वेळ. बाहेर पावसाचं वातावरण. जवळ लहान बाळ. आजूबाजूला अपरिचित लोक.

एस.टी. सुरू होते. घाबरून ती कंडक्टरला आपल्या माहेरच्या गावचे तिकीट मागते. कंडक्टर सांगतात की, ही गाडी त्या ठिकाणी नाही जात. तुम्ही गाडीतून उतरा.

ती घाबरते. मध्येच उतरली या काळोखात तर आणखी काही तरी संकट येईल. शेवटी ती विनंती करते. मला इथले काही माहीत नाही कृपया मला मदत करा.

त्याच दरम्यान तिच्या खांद्यावर कोणीतरी हात ठेवला. त्या थंडगार स्पर्शाने ती दचकली. त्यांच्याच गावातील एक म्हातारी आजी तिला विचारत होती, 'तू लक्ष्मण पाटलाची लेक व्हयं ना! आणि या वक्ताला इथं काय करतीस?' सीमाने घाबरत आजीला थोडक्यात सर्व सांगितले. 'काळजी करू नको पोरी पुढच्या कडेगावातून आपल्या गावाला जाणारी ट्रॅव्हल लागते आता थोड्यावेळाने येईलच.'

सीमा घरी पोहोचते तिथेसुद्धा वडील तिला समजावतात. पण ती जीवाच्या भितीने पुन्हा सासरी जाण्यास नकार देते. सुजय तिच्या चारित्र्यावरून वाटेल ते बोलण्यास सुरुवात करतो.(फोनवरून)

त्याचवेळी सीमाने सांगितले की, मी माझ्या लेकीसाठी रीतसर घटस्फोट घेतय. मला नवऱ्याकडून एकही रुपया पोटगी म्हणून नकोय. मी नोकरी करून माझ्या लेकीला सांभाळीन. हे सर्व समजताच सीमाची मोठी बहीण दोन-चार दिवसांनी तिला भेटायला येते तिला धीर देते.

काही दिवसांनी सीमा व आई मुंबईला आपल्या घरी येतात. वडील सेवानिवृत्त झाल्यामुळे गावालाच शेती करण्यासाठी थांबतात. अचानक एक दिवस आई आजारी पडते व तिचा स्वर्गवास होणे. सीमा सुन्न होते.

एक आईचा आधार होता. तोच अचानक निघून गेला. कारण आईच्या आग्रहामुळेच वडील व भाऊ काही बोलत नव्हते. आई वारल्यानंतर भावाने तिला घरात नकोसे केले होते. वहिनीने तर कळस केला. दोघेही तिला लाईट बील भर, जेवणावरून वाद घालू लागले. हे सर्व ती तिच्या मोठ्या ताईला सांगून मन मोकळे करायची. नतर तर तिने स्वतःसाठी व लेकीसाठी बाहेर खाणावळीतून जेवण आणू लागली. मुलीला पाळणा घरात ठेवून दिवसभर कंपनीत कष्ट करू लागली. कधी कधी आईच्या आठवणीने खूप खूप एकटीच रडायची तेव्हा मोठी ताई सोनल तिला धीर द्यायची. सीमाची समजून काढायची. तिला आपल्या आईने दिलेली लहानपणीची शिकवण सांगते.

'मुलींनो भरपूर शिका, स्वतःच्या पायावर उभ्या रहा, खूप प्रयत्न करा, प्रगती करा व स्वयंसिद्ध व्हा!'

आई नेहमी तिला तीन मुली झाल्यावर काय त्रास झाला होता ते सांगायची. सीमा खूप मेहनत करून आपल्या छोटीचा सांभाळ करत होती. तिला लाडाने ती 'परी' म्हणून हाक मारायची आणि परी खरंच परीसारखी दिसायला सुंदर होती.

सीमाच्या भावाला हे सर्व का पटत नव्हते? तीन मुलींच्या पाठीमागून जन्माला आलेला लाडाकोडात वाढलेला. त्यामुळे तो वडिलांची सर्व संपत्ती आपलीच असे समजून चांगली इंजिनियरची नोकरी सोडली. वडिलसुद्धा त्यालाच प्रोत्साहन देत! सोडली तर सोडली नोकरी, मी तुला जन्मभर असा पोसेन. माझ्या वंशाचा तू दिवा आहेस!

थोडक्याच दिवसात भाऊ सीमाला घरातून हाकलण्यास त्रास देऊ लागला. भांडणे काढून प्रसंगी मारू लागला. सर्व बाजूंनी आधार तुटलेली सीमा आत्महत्येच्या विचाराने बाहेर पडली.

कारण आज रक्षाबंधनाच्या दिवशी लाडक्या भावाने तिला शेवटचे सांगितले की, 'मुलीला घेऊन घरातून बाहेर पड. हे घर फक्त माझे आहे.'

रागारागाने ती तडफडतच घरातून बाहेर पडते.

औषधापेक्षा झोप जास्त बरी. - जॉन रे

रेल्वेट्रॅक जवळ तंद्रीत तिचे पाय वळतात. जाता जाता ती ताईला फोन लावते. रडत रडत सांगते, 'ताई माझ्या परीला सांभाळ. त्या लहान जीवाला ना आईचं सुख ना बापाचं सुख. मी तुला परत कधीच दिसणार नाही गं!'

ताई खूप असह्य होतंय. लहानपणापासून तिसरी मुलगी म्हणून बाबांनी कधीच लाड केले नाहीत. पण ताई सांग ना माझ्या नावाप्रमाणे माझ्या दुःखाला कोठे सीमा आहे का?

ताईने तिला फोनवरूनच समजावले. 'रेल्वे रुळापासून लांब ये. मी तुला मदत करतेय व आईला सांगितल्याप्रमाणे यापुढे ही करीन. सीमा आईचे शब्द पुन्हा पुन्हा आठव. तुझ्या छोट्या परीचा चेहरा आठव. परीला तुला खूप मोठं करायचंय सीमा (लालू). तूला आठवतंय लहानपणी आपण एक गाणं गुणगुणायचो. ऐक ना. शांतपणे कुठेतरी बस. रडू नको. मागे फिर'

'कहती सारी फिजा, कोशिश तो कर जरा,
बदल जाऐगा नसिब तेरा, कहती सारी फिजा,
देखो सुरज ढल गया, फिर से सुरज आऐगा।
सोनेवाला जग गया, जाने कब तू जागेगा
अपना रस्ता बंदे खुद बना
बदलेंगा फिर सब सारा जहाँ।।'

'सीमा (लालू) तुला अशा कितीतरी स्त्रिया सांगू त्यांनी मोठ्या संकटावर मात करून आनंदाने व स्वाभिमानाने या जगात जगत आहेत. लालू तुला जगायचंय!'

सीमाचे पाय आपोआपच मागे वळले. एक नवी आशा, महत्त्वाकांक्षा घेऊन ती जगाशी लढायला सिद्ध झाली. मुलीचा चेहरा डोळ्यांसमोरून हटत नव्हता. झरझर पाऊले घराकडे वळली. लेकीला जवळ घेऊन खूप खूप रडली.

काही महिन्यांनी भाऊ विचारतो सीमाला, 'ताई तुला काय पाहिजे ते माग आज भाऊबीजेला. आज आपण परीला नवीन कपडे आणू या का? तुला कामातून कधी वेळ मिळेल. चल आपण फिरायला जाऊ या.'

सीमा म्हणते 'अरे वा! भाऊ आज किती चांगला वागतो आहेस. एक कोर्टातर्फे केस आम्ही बहिणींनी टाकली आणि या घरातील आमचा हक्क मागितला. कारण की हे घर आपल्या आजोबांचे आहे. तर तुझ्यात किती बदल झालाय.' जरा हसतच सीमा म्हणाली, 'सगळा मान व्यवस्थित करतोय. माझं खाणावळीतलं जेवणपण बंद केलंस.

वहिनीसुद्धा बहिणीप्रमाणे वागू लागली. तू आता स्वतः कमव, बाबांच्या जीवावर राहू नकोस. नोकरी कर, व्यवसाय कर. तू स्वतः स्वयंसिद्ध हो. हीच मला आज भाऊबीजेची ओवाळणी दे!'

**– सौ. कांचन गणेश मोहिते**
डॉ. बेडेकर विद्यामंदिर,
प्राथमिक विभाग, ठाणे

●●●

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

निद्रा म्हणजे अल्पकालीन मृत्यू आणि मृत्यू म्हणजे दीर्घकालीन निद्रा. – फिनिस फ्लेचर

# क्वालिटी ऑफ गुड मार्केटिंग मॅनेजर

- मॅनेजर हा एक केवळ मॅनेजर नसून बिजनेस करण्याकरिता आवश्यक असलेल्या अनेक गोष्टी, अनेक अडचणी, तक्रारी ह्या सगळ्यांना योग्य रीतीने हाताळून त्यांचा योग्य प्रकारे उपयोग करून रिझल्ट देईल अशी व्यक्ती म्हणून कंपनी त्याच्याकडे पाहते.
- मॅनेजरने आपल्या एरियातील टीम निवडताना टेरेटेरीच्या प्रकारे योग्य अशी व्यक्ती निवडून व त्या व्यक्तीला योग्य प्रकारे ट्रेनिंग देऊन त्याला मार्केटमध्ये पाठवावे.
- मॅनेजरने आपल्या जवळ असलेली टीम आणि आपले वरीष्ठ ह्या दोघांच्यामध्ये योग्य रीतीने संवाद जुळवून व त्यात काही त्रुटी असतील त्या योग्यप्रकारे हाताळल्या पाहिजेत.
- मॅनेजरने आपल्या बरोबर काम करणारी टीम मेंबर असतील त्यांना ज्युनियर न समजता आपलेच सहकारी आहेत असे वर्तन करून त्यांच्याकडून योग्यरीतीने काम करून घेता आले पाहिजे.
- मार्केटमधील इतर कंपन्यांचे आपल्या प्रॉडक्टचा Compititor Data म्हणजेच त्यांचे रेट व त्या प्रॉडक्टवर काही ऑफर असतील तर ती आपल्याला माहिती पाहिजे व ती माहिती आपल्या कंपनीच्या वरिष्ठापर्यंत पोहचवली पाहिजे.
- आपल्या जवळील टीमचा सेल्स पथ हा आठवड्यातून (Weekaly) Analiyes केला पाहिजे. नुसतेच Analiyz न करता त्यातील त्रुट्या ह्या आपल्या सहकाऱ्यांना समजावून व त्या दुरुस्त करून आपला व्यवसाय कसा वाढेल याचे प्लानिंग करता आले पाहिजे.
- आपल्या टीममधील एखादी व्यक्ती काही कारणाकरिता सुट्टीवर असेल तर त्या व्यक्तीचे राहिलेले काम (टारगेट) हे आपल्या इतर सहकाऱ्यांच्या मदतीने पूर्ण करून घेतले पाहिजे. जेणेकरून आपल्या Monthaly टारगेट पूर्ण करण्याकरिता अडचण येणार नाही.
- आपण मार्केट करत असताना एखाद्या Consumer ने आपल्या प्रॉडक्ट्स विषयी काही त्रुटी किंवा काही बदल करण्यास सांगितले असतील तर आपण त्या Consumer ला व्यवस्थित कन्व्हेन्स करून त्याने सांगितलेली माहिती ही आपल्या वरिष्ठांना सांगून जर शक्य झाल्यास जर प्रॉडक्टमध्ये थोडा फार चांगला फरक झाला तर करून घेतला पाहिजे.
- मॅनेजरने वेळोवेळी घडणाऱ्या सेल चुका शक्यतो टाळाव्यात.
- मॅनेजरचे काम केवळ स्वतःची प्रगती न करता आपल्या ज्युनियर सहकाऱ्यांच्या प्रगतीचा देखील प्रयत्न करावा व त्यांना त्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन करून मोटीवेट करून ते कसे मोठे होतील याचा विचार करावा व त्यासाठी वेळ पडल्यास मार्केटमध्ये त्याच्याबरोबर Action Man करून त्याच्यासमोर उदाहरण ठेवावे, जेणेकरून त्यांचा आत्मविश्वास वाढेल व ते व्यवस्थितरित्या आपले काम, कर्तव्य पार पाडू शकतील व हे करत असताना आपल्या सहकाऱ्यांचा विकास प्रगती तर होईलच त्यांच्याबरोबर आपली देखील प्रगती होत राहते.

**सुर्चवाल्मिक सुर्यवंशी**
ज्यू. ए.एस.एम.
AGBT विभाग, ठाणे.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, प्राथमिक विभाग

बुधवार दि. ८ नोव्हेंबर २०१७ ते शुक्रवार १० नोव्हेंबर २०१७ अखेर प्रगत शैक्षणिक कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक प्रगती चाचणी 'संकलित मूल्यमापन' विद्यार्थ्यांची घेण्यात आली.

मंगळवार दि. १४ नोव्हेंबर २०१७ रोजी 'बालदिना' निमित्त विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. 'पंडित जवाहरलाल नेहरूंच्या जीवनातील प्रसंग' ही निबंध स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत कु. दीपाली विकास ढोके इ. ४थी ५ हिला प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले.

बुधवार दि. २२/११/२०१७ रोजी इ.१ली ते इ.४थीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल 'सृष्टी फार्म' वाशिंद येथे नेण्यात आली. औषधी वनस्पतींची ओळख, मसाल्याचे पदार्थ ओळख, गोबर गॅस, सौर ऊर्जेवर चालणारी उपकरणे, कंपोस्ट खत प्रकल्प इ. वैज्ञानिक माहिती विद्यार्थ्यांनी मिळवली. तसेच झोपाळे, घसरगुंड्या, सी-सॉ, पावसातील मौज याचा मनसोक्त आनंद विद्यार्थ्यांनी लुटला.

'स्वच्छता मोहिमे अंतर्गत' विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छता, शालेय परिसर स्वच्छता, घर-परिसर स्वच्छता महत्त्व पटवून देऊन स्वच्छतेचा आग्रह धरावा हे सांगण्यात आले.

बुधवार दि. १३/१२/२०१७ रोजी 'वार्षिक स्नेहसंमेलन व सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या दिमाखात व उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या मा. श्रीमती नीला लुमण यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मिडास राजाची गोष्ट सांगून अति लोभ वाईट हे मुलांच्या मनावर बिंबविले. सदैव आनंदी, उत्साही रहा, नियमीत व्यायाम करा, अभ्यास करा, घरी बनवलेले पदार्थ खा असा मौलिक सल्ला दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्रीयुत अुत्तम जोशी साहेब यांनी मातृभाषेतून शिक्षणाचे महत्त्व पालकांना पटवून दिले. 'तुम्ही विद्यार्थी भाग्यवान आहात कारण मराठी माध्यमाच्या शाळेतून शिक्षण घेत आहात', हे सांगितले. तसेच कार्यक्रमाचे उत्तम संयोजन केल्याबद्दल कु. दीपाली विकास ढोके इ.४थी ५ ह्या विद्यार्थिनीचे कौतुक केले.

**माझ्या मराठीचे बोलु कौतुके।**
**अमृतातेही पैजा जिंके।**

मराठी भाषेतील संतवाङ्मयाचे दर्शन मनोरंजनातून व्हावे यासाठी विविध संत रचनांचा अंतर्भाव असलेला 'अवघी दुमदुमली पंढरी' ह्या विषयावरील सांस्कृतिक कार्यक्रम विचारपूर्वक निवडण्यात आला.

**पंढरीचा विठ्ठल लेकुरवाळा। संगे संतांचा मेळा।।**

निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, नामदेव, तुकाराम, एकनाथ, गोरा कुंभार, सावतामाळी, चोखामेळा, संत मुक्ताबाई, संत जनाबाई यांचे अभंग, भारुड, ओव्या, गवळण अशा पारंपरिक रचना घेऊन आलेला सांस्कृतिक कार्यक्रम 'संस्कारांचा ठेवा' विद्यार्थ्यांना देऊन गेला. विठ्ठलाच्या भक्तिरसात सर्व विद्यार्थी-पालक अक्षरशः न्हाऊन निघाले.

पारितोषिक वितरण समारंभात विद्यार्थ्यांना बक्षीसे देऊन गौरविण्यात आले. पुढील शिक्षकांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सौ. संगीता बागवाले (उत्तम सजावट)

सौ. ऊर्मिला परदेशी (बी. एड्. पदवी संपादन)

सौ. गीताली अंबिके (आदर्श शिक्षिका)

सौ. सुवर्णा खाणेकर (संगणक उत्तम मार्गदर्शन)

दि. २१ ते २३ डिसेंबर २०१७ या कालावधीत 'क्रीडामहोत्सव' संपन्न झाला. यात अडथळा शर्यत, लंगडी, धावणे, दोरी उड्या इ. वैयक्तिक स्पर्धा घेण्यात आल्या.

शिक्षणज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व विशद करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी भाषणे सादर केली. विद्यार्थ्यांना चित्रफीत दाखविली.

सोमवार दि. ८ जानेवारी २०१८ रोजी स्वामी विवेकानंद जयंती निमित्त वर्गावर्गात स्वामी विवेकानंदांचे विचार, आचार, त्यांची प्रगल्भ बुद्धीमत्ता यांची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली.

बुधवार दि. १० जानेवारी २०१८ रोजी विद्यार्थ्यांना वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त ढोकळा, समोसा, गाजर हलवा हा 'अल्पोपहार' देण्यात आला.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

➢ **स्नेहसंमेलन**

दि. ११ व १२ डिसेंबर २०१७ रोजी स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ साजरा झाला.

दि. ११ डिसेंबर २०१७ रोजी इ.५वी ते ७वीच्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ झाला. या कार्यक्रमासाठी बेलवली शाळेचे मुख्याध्यापक व शाळेचे माजी विद्यार्थी श्री. धीरज डोंगरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

दि. १२ डिसेंबर २०१७ रोजी इ.८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ झाला. या कार्यक्रमासाठी लेखक, संशोधक, समुपदेशक श्री. यशोधन वर्तक हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

दोन्ही दिवशी विद्या प्रसारक मंडाळाचे सहसचिव श्री. जयंत कयाळ हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

या समारंभात कु. प्रज्ञा राजेंद्र मोरे व समर्थ मनीष चौधरी यांना आदर्श विद्यार्थी म्हणून गौरविण्यात आले.

➢ दि. १३ डिसेंबर ते १५ डिसेंबर २०१७ रोजी इ. ९ वी १०वीची शैक्षणिक सहल वेळणेश्वर व कोल्हापूर परिसर येथे गेली.

➢ १४ डिसेंबर व १५ डिसेंबर २०१७ रोजी इ.७वी, ८वीची सहल सिल्व्हासा येथे गेली.

➢ श्री मावळी मंडळ ठाणे यांचेतर्फे १४ वर्षांखालील मुलांची कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत आपल्या शाळेच्या संघाने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.

➢ 'थोरा मोठ्यांची भेट' या उपक्रमांतील '५वे पुष्प' दि. १९/१२/२०१७ रोजी आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सौ. अपर्णा कुलकर्णी या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी ताण-तणावाचे प्रकार, त्यांचे नियंत्रण, आहाराचे प्रकार, योग्य संतुलित आहार, परीक्षा जवळ आल्यावर करावयाचे अभ्यासाचे नियोजन या विषयांचे इ. १० वीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

➢ दि. २० डिसेंबर २०१७ इ.६वीच्या विद्यार्थ्यांची 'रामायण परीक्षा' झाली.

➢ दि. २७ ते ३१ डिसेंबर २०१७ अहमदाबाद येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील 'विज्ञान प्रकल्प प्रदर्शन' यामध्ये इ.९वीच्या कु. प्रज्ञा मोरे व सेजल रांगळे या विद्यार्थिनींनी 'An Iron Delicacy' हा प्रकल्प सादर केला.

➢ दि. ३ जानेवारी २०१८ ''थोरा मोठ्यांची भेट' या उपक्रमाचे 'सांगता पुष्प' साजरे झाले. इ.१०वीच्या विद्यार्थ्यांनी २०० पुस्तकांची तर शाळेचे माजी

मुख्याध्यापक श्री. चिटणीस सरांनी 'स्वा. सावरकरांचे १० खंड' या ग्रंथांची भेट शालेय ग्रंथालयासाठी दिली. विद्या प्रसारक मंडळाचे सन्माननीय कार्याध्यक्ष डॉ. श्री. विजय बेडेकर यांनी शाळेतर्फे या ग्रंथांची भेट स्वीकारली. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या.

➢ दि. ५ जानेवारी २०१८ रोजी शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर यांना अल्पोपाहार देण्यात आला.

### सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

दिवाळीच्या सुट्टीनंतर २ नोव्हेंबर रोजी शाळेचे दुसरे सत्र सुरू झाले.

नोव्हेंबर : बालदिन : १४ नोव्हेंबर : या दिवसाचे औचित्य साधून फॅन्सी ड्रेस डे चे आयोजन केले होते. ज्युनियर के. जी. च्या मुलांना त्यांच्या सोयीचा (Comfortable) पोशाख करावयाचा होता. फळे, भाज्या, प्राणी असे विविध पोशाख मुलांनी घातले होते.

सिनियरच्या मुलांना त्यांच्या आवडत्या जाहिरातीचे सादरीकरण व त्यासाठी योग्य तो पोशाख असा विषय होता. विविध बिस्किटे, मॅगी, डेटॉल अशा वेगवेगळ्या जाहिराती मुलांनी सादर केल्या.

डिसेंबर : हा महिना अनेक उपक्रमांनी भरगच्च असतो. १ डिसेंबरपासूनच आमच्या स्नेहसंमेलनाची तयारी सुरू झाली. १४ डिसेंबर माध्यमिक, १५ डिसेंबरला प्राथमिक व १६ डिसेंबर रोजी पूर्व प्राथमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलन पार पडले.

ज्युनिअर के. जी. च्या मुलांनी इंग्रजी, हिंदी व पोर्तुगीज अशा विविध भाषांतील गाण्यांवर नृत्य सादर केली. तर सिनियरच्या मुलांनी मराठी, गुजराथी, भाषेतील गाण्यांवर नृत्य, तर 'पाईडपायपर ऑफ हॅमलिन' हे नाटुकले सादर केले. मुलांचे वय, क्षमता लक्षात घेऊन शिक्षक गाण्यांची निवड करतात. नृत्य, नाटक हे सर्व मुलांकडून करून घेताना शिक्षकांना येणाऱ्या अडचणी, पालकांचे सहकार्य या सर्वांची कल्पना विभाग प्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांनी त्यांच्या स्वागत व प्रास्ताविकपर भाषणात दिली. आमच्या बालकलाकारांचा उत्साह, धिटपणा बघून पालक खूष झाले. आमचा हा सोहळा अतिशय रंगतदार झाला.

**१८ व १९ डिसेंबर : क्रीडा दिन**

१८ डिसेंबर – ज्यूनिअर व १९ डिसेंबर – सिनीयर ज्यूनियर : धावणे, पुस्तक डोक्यावर ठेवून तोल सांभाळून चालणे, अडथळ्यांची शर्यत.

सिनीयर – धावणे, ठोकळ्यांची शर्यत, गोणपाट घालून उड्या मारणे.

असे स्पर्धात्मक खेळ क्रीडादिनाच्या दिवशी शाळेच्या आवरात घेण्यात आले. सर्वच मुलांना त्यांच्या सहभागाबद्दल बक्षिसे दिली गेली. ज्यूनियरच्या मुलांना टेबल टेनिसची बॅट चेंडू तर सिनियरच्याच मुलांना इंग्रजीतील छोटी गोष्टींची पुस्तके देण्यात आली.

**२० डिसेंबर : अल्पोपाहार**

छोले, पुरी व गाजर हलवा असा खाऊ मुलांना देण्यात आला. मुलांनी रुचकर खाऊ आवडीने खाल्ला व आवडल्याची दादही दिली.

२१ डिसेंबर : आनंद बाजार – ह्या उपक्रमात सर्व शाळेचा सहभाग असतो. विद्यालंकार सभागृहात पूर्व प्राथमिक विभागाची दुकाने (Stall) होती. सिनीयरची काही मुले शिक्षकांसोबत दुकानदाराची भूमिका पार पाडत होते. बिस्किटे, खाऊ बरोबरच मुलांनी तयार केलेली ब्रेसलेट्स, वॉल हँगिंगस्, पाकिटे इत्यादी विकण्यास आमचे छोटे दुकानदार तत्पर होते. ज्यूनियर व नर्सरीची मुले गिऱ्हाईक बनून पालकांसोबत खरेदीचा आनंद लुटताना दिसत होती.

गोऱ्या कातड्याच्या मागे बहुधा काळे मन लपलेले असते. – डब्ल्यू. जी. बेनहॅम

२२ डिसेंबर : नाताळ : २५ डिसेंबरला येणारा नाताळचा सण आम्ही २२ तारखेला शाळेत साजरा केला. प्रवेशद्वाराजवळ चांदणी, ख्रिसमसचे झाड, स्नो मॅन लावण्यात आले होते. पांढऱ्या व लाल रंगाचे कपडे घातलेले आमचे सगळेच चिमुकले सांताक्लॉजची वाट बघत होते. ज्यूनियर व सिनीयरचा प्रत्येकी एक विद्यार्थीच सांताक्लॉजच्या वेशात आला होता. सर्वांनी नाच केला, गाणी गायली व सांताने सर्वांना केकचा गोड गोड खाऊ दिला.

**२७ डिसेंबर : आंतर शालेय स्पर्धा**

संस्कृती कला दर्पण या संस्थेतर्फे दरवर्षी आंतर शालेय स्तरावर नृत्य, नाटक अशा विभागांसाठी स्पर्धांचे आयोजन केले जाते. गेली ५ वर्षे सातत्याने आमचे विद्यार्थी या स्पर्धेत भाग घेऊन बक्षिसं मिळवत आहेत. यावर्षी नृत्य प्रकारात सिनियरच्या मुलींनी गरबा सादर केला व उत्कृष्ट नृत्याचे (प्रथम क्रमांक) बक्षीस पटकावले.

तसेच नाटक विभागात 'पाईड पायपर ऑफ हॅमलिन' या नाटकासाठी अर्जुन वायंगणकर याला उत्कृष्ट अभिनेता तर उत्कृष्ट दिग्दर्शनाचे बक्षीस आमच्या शिक्षिका सौ. योगिता नाईक यांना मिळाले.

जानेवारी – नवीन वर्षाचे (२०१८) चे स्वागत अतिशय उत्साहात झाले. या महिन्यातील काही उपक्रम ज्यूनियरच्या के. जी. मुलांना मटारच्या शेंगा आणायला सांगितल्या होत्या. शेंगा निवडून सोललेले दाणे मुलांना शिजवून दिले. त्याचा चट्टामट्टा मुलांनी मधल्या सुट्टीत केला.

१२ जानेवारी – सहल – यावर्षी आमची सहल घोडबंदर रोडवरील 'मोनालिसा गार्डन आणि रिसॉर्टर्स'ला नेण्यात आली होती. ज्यूनियर व सिनियरच्या मिळून जवळपास ३० मुलांनी या सहलीचा आनंद लुटला. सकाळी ९.३० वाजता बसने निघून १५–२० मिनिटांतच आम्ही पोहोचलो. इडली, चटणीचा नाश्ता करून मुले खेळायला गेली. मनसोक्त खेळली, बागडली, श्रीखंड, पुरी, बटाट्याची भाजी असा आवडीचा मेनू जेवणात बघून मुले खूष झाली. यानंतर जादूचे प्रयोग, नाच झाला. निघताना कप केक, चॉकलेटचा खाऊ हातात घेऊन आम्ही निघालो. ५ वाजता शाळेत परतलो.

१५ जानेवारी – १४ जानेवारीला येणारा संक्रात सण आम्ही १५ तारखेला साजरा केला. सर्वांनी काळ्या रंगाचे कपडे परिधान केले होते. आपण तिळगूळ, गुळाची पोळी का खातो? काळे कपडे का घालतो? विविध राज्यात संक्रांत सण कसा साजरा केला जातो याची माहिती शिक्षकांनी मुलांना दिली. मुलांना तिळगूळ दिला गेला आणि 'गोड गोड बोला' हा संदेशही दिला.

ज्यूनियरच्या मुलांनी घोटीव कागदांचा पतंग केला. तर सिनियरच्या मुलांनी विविध रंगांच्या, आकाराच्या पतंगांची चित्रे काढली. या दिवशी मुलांसाठी 'गीत वा कविता' (कुठल्याही भाषेतील) सादर करण्याचा उपक्रम घेतला. काही मुलांनी अतिशय प्रभावीपणे गीत सादरीकरण केले.

**२६ जानेवारी – प्रजासत्ताक दिवस**

२५ जानेवारीला हा दिवस अतिशय उत्साहात साजरा झाला. झेंड्याचे रंग असलेले कपडे घालून 'भारतमाता की जय' म्हणून राष्ट्रगीत म्हणताना झेंड्याला वंदन करणारी आमची चिमुरडी पाहून फारच अभिमान वाटला. ज्यूनियरच्या मुलांनी झेंड्याचे रंग वापरून चित्र रंगवले, तर राष्ट्रीय चिन्हे म्हणजे आंबा (राष्ट्रीय फळ), कमळ (राष्ट्रीय फूल), वड (राष्ट्रीय झाड) सिनियरच्या मुलांनी रंगवली. सिनियरच्या मुलांची छोटीशी परेड व देशभक्तीपर गीते ही सुद्धा या दिवसाच्या निमित्ताने घेण्यात आली.

**२९ जानेवारी – गोष्ट दिवस**

ज्यूनियर व सिनियरच्या मुलांसाठी ह्या दिवशी गोष्ट सादर करण्याचा उपक्रम घेतला गेला. सोपी,

छोटीशी गोष्ट हावभावांसहीत सादर करायची होती. पालकांनी मुलांकडून करून घेतलेली तयारी मुलांच्या सादरीकरणातून दिसून येत होती.

**Unified International English Olympiad (UIEO) :**

२०१७ मध्ये प्राथमिक विभागातून खालील विद्यार्थी परीक्षेत राष्ट्रीय स्तरावर उत्तीर्ण झाले.

| अनु क्र. | विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक |
|---|---|---|
| | **इ. २ री** | |
| १. | कु. नेसरीकर इरा समीर | प्रथम |
| २. | कु. मेहेंदळे आर्या आशीष | द्वितीय |
| ३. | कु. पोटे अवनिश गजानन | तृतीय |
| | **इ. ३ री** | |
| १. | कु. कर्णिक यश महेश | प्रथम |
| २. | कु. खामकर विधी विनायक | द्वितीय |
| ३. | कु. गानु वरदा आशीष | तृतीय |
| | **इ. ४ थी** | |
| १. | कु. खानझोडे आदित्य समीर | प्रथम |
| २. | कु. जोगळेकर तन्मय चैतन्य | द्वितीय |
| ३. | कु. परशुरामी शची राहुल | तृतीय |

कु. खानझोडे आदित्य समीर या विद्यार्थ्याने राष्ट्रीय स्तरावर दुसरा क्रमांक पटकावला. सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

➢ **विज्ञान प्रकल्प कसे करावेत हे शिकण्यासाठी आमच्या पाच विद्यार्थ्यांनी 'बेल्ट आणि रोड टिनएजर कॅम्प' मध्ये भाग घेतला होता. विद्यार्थ्यांना पुढील पारितोषिके मिळाली –**

१) आदिती पेंडसे – बेस्ट प्रेझेंटेशन अवॉर्ड

२) चैत्राली मांजरेकर आणि साशा गोरे – बेस्ट मेकर अवॉर्ड

३) केदार हर्डीकर आणि अभिराज कुलकर्णी – बेस्ट टिमवर्क अवॉर्ड

➢ **आमच्या शाळेचा विज्ञान प्रकल्प – "Gutter Water Farming : Slow Poison to you platter" हा जिज्ञासा ट्रस्ट आयोजित नॅशनल चिल्ड्रन सायन्स कॉंग्रसमध्ये राष्ट्रीय स्तरावर निवडला गेला.**

गटप्रमुख कु. आयुष म्हात्रे व इतर सदस्य कु. वरदा ढापरे व कु. सिया चौधरी, मिहीर आगाशे व ऋतुजा पाटणकर.

➢ **युनिफाईड आंतरराष्ट्रीय इंग्लिश ऑलिंपियाडचा निकाल :**

राष्ट्रीय स्तरावर क्रमांक पटकावलेल्या विद्यार्थ्याचे नाव पुढील प्रमाणे :

| इ. | विद्यार्थ्यांची नावे | क्रमांक |
|---|---|---|
| ७ वी | मृण्मयी गांगल | ९५ वा |

➢ **महाराष्ट्रभाषा आयोजित हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा २०१७ – २०१८ चा निकाल :**

| इ. | परीक्षेचे नाव | उपस्थित विद्यार्थी | निकाल | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | विशेष प्रावीण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
| ५ वी | बालबोधिनी | ०९ | ०४ | ०४ | ०१ | – |
| ६ वी | प्राथमिक | ०५ | ०१ | ०३ | ०१ | – |
| ७ वी | प्रवेशिका | ०२ | – | – | ०२ | – |
| ८ वी | सुबोध | ०२ | – | – | – | ०२ |

**संस्कृती कलादर्पण आयोजित आंतरशालेय नृत्य स्पर्धेचा निकाल :**

आमच्या शाळेच्या इयत्ता ७ वी च्या ४० विद्यार्थ्यांनी भांगडा प्रस्तुत केला व प्रथम क्रमांक पटकावला.

**क्रिडा – DSO तर्फे घेतलेल्या विविध स्पर्धांत आमच्या विद्यार्थ्यांनी खालील पारितोषिके मिळवली :**

१) जलतरण – राजेश्वर देसाईला ५० मि. बटरफ्लाय स्पर्धेत तालुका पातळीवर कांस्य पदक मिळाले.

२) टेबल टेनिस – आद्यश्री जोग तालुका पातळीवर U१४ मुलींच्या गटात निवडली गेली.

३) जिमनॅस्टिक – ऋचा देवळेला 'रिदमिक जिमनॅस्टिक स्पर्धेत महाराष्ट्राच्या गटामध्ये सदस्य म्हणून सुवर्णपदक मिळाले.

४) स्केटिंग – तालुका पातळीवर कस्तुरी बापटला कांस्य पदक मिळाले.

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

**कै. डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचे १४ वे पुष्प डॉ. दीपक टिळकांनी गुंफले.**



दि. ११ जानेवारी रोजी कै. डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचे १४ वे पुष्प टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक यांनी 'लोकमान्य टिळक : आधुनिक भारताचे जनक' या विषयावर गुंफले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी लोकमान्य टिळकांच्या विचारांचे सद्यस्थितीत औचित्य अधोरेखित केले.

टिळकांनी स्वातंत्र्य प्राप्तीसाठी झेललेल्या कष्टांना उजाळा देत त्यांच्या स्वराज्य, स्वदेशी, भारतीय शिक्षण व असहकार या चतुःसूत्रीचा उल्लेख केला. गीतारहस्य मधील संन्यास संकल्पनेला टिळकांनी एक वेगळा आयाम दिला. घर सोडून मोक्षप्राप्तीसाठी बाहेर पडणे म्हणजे संन्यास नसून देशासाठी सर्वसंग परित्याग करणे व स्वराज्य प्राप्तीसाठी समर्पण करणे म्हणजे संन्यास होय असे ते म्हणाले.

टिळकांनी लिहिलेल्या केसरीतील अग्रलेखांचा उल्लेख करत त्यांच्या आर्थिक विचारांचा मागोवा डॉ. दीपक टिळक यांनी घेतला.

संज्ञापन विभागाचे समन्वयक डॉ. महेश पाटील यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत पु. धर्माधिकारी यांनी केले.

**जोशी बेडेकर फिल्म सोसायटीच्यावतीने चित्रपट रसास्वाद कार्यशाळा संपन्न**



दिनांक १७ जानेवारी २०१८ रोजी ठाण्याच्या जोशी–बेडेकर महाविद्यालयाच्या 'फिल्म सोसायटी' ने एक कार्यशाळा आयोजित केली. यामध्ये चित्रपट कसा समजून घ्यावा. त्यातील बारीकसारीक गोष्टींचे निरीक्षण

कसे करावे, त्या चित्रपटाबद्दल आपली मतं कशी मांडावीत याविषयीचे मार्गदर्शन महाविद्यालयाच्याच माजी विद्यार्थ्याने गंधार बेडेकर याने केले. प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष पत्रकारिता या विभागाचे विद्यार्थी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने हजर होते.

गंधार बेडेकर याने बी. एम्. एम्. मधून पदवी प्राप्त केली व मिडिया क्षेत्रातील त्याच्या आवडीमुळे तो या क्षेत्राकडे वळला. त्याला चित्रपट क्षेत्रात प्रवेश करून एक उत्तम दिग्दर्शक व्हायचे आहे. याचे अनुशंगाने तो पावले उचलत आहे. मागील दोन ते अडीच वर्षांपासून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चित्रपट पुरस्कार विजेते दिग्दर्शक उमेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली शिकत व काम करत आहे. उमेश कुलकर्णी यांचे वळू, विहीर, देऊळ, हायवे यांसारखे चित्रपट प्रसिद्ध आहेत. 'गिरणी' आणि 'Three of Us' हे त्यांचे काही लघुचित्रपट.

या कार्यशाळेत गंधार याने विद्यार्थ्यांशी उत्स्फूर्त संवाद साधला. यावेळी विद्यार्थ्यांना 'गिरणी' हा उमेश कुलकर्णी दिग्दर्शित लघुचित्रपट दाखवण्यात आला. हा लघुचित्रपट २००५ ला बनवण्यात आला. कमी संवाद व संगीताच्या जास्त प्रभावाने चित्रपटात असलेल्या व्यक्तिरेखांची मनःस्थिती दाखवण्याचा एक वेगळाच प्रयोग यात केला आहे. याशिवाय उत्तम रंगसंगती, लाईट्स, कॅमेराच्या हालचाली आहेत. या चित्रपटातील प्रत्येक गोष्ट आपल्याला काहीतरी सांगून जाते. लघुचित्रपट पाहिल्यानंतर विद्यार्थ्यांशी पुन्हा संवाद साधण्यात आला. त्यांची मतं विचारण्यात आली. गंधार बेडेकर याने लहानसहान गोष्टींचा अर्थ उलगडून सांगितला. कमी संवादांच्या आधारे देखील एक चित्रपट लोकांपर्यंत किती उत्तम पद्धतीने पोहोचू शकतो याचे उदाहरण म्हणजे 'गिरणी'

प्रत्येकाने बोलायला शिकले पाहिजे. आपली मतं इतरांना समजावून सांगता आली पाहिजेत असे संदेश गंधार याने विद्यार्थ्यांना दिले. भविष्यात उपयोगी पडतील असे मुद्दे विद्यार्थ्यांना यातून समजले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात ही कार्यशाळा संपन्न झाली. या प्रसंगी फिल्म सोसायटीचे अध्यक्ष प्रा. प्रशांत धर्माधिकारी, पत्रकारिता विभागाचे समन्वयक डॉ. महेश पाटील व उपप्राचार्या मोनिका देशपांडे यासुद्धा उपस्थित होत्या.

**स्मार्ट सिटीज : द रोड अहेड' या विषयावर राष्ट्रीय परिषदचे आयोजन**




विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात 'स्मार्ट सिटीज : द रोड अहेड' या विषयावर राष्ट्रीय परिषदचे उद्घाटन हिवरेबाजार गावचे सरपंच व स्वयंपूर्ण गाव चळवळीचे प्रणेते श्री. पोपटराव पवार यांच्या हस्ते झाले. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या संदेशाचे ध्वनिचित्रण सुरुवातीला दाखवण्यात आले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी परिषदेची तात्विक पृष्ठभूमी विशद केली. परिषदेच्या समन्वयक प्रा. नीलम शेख यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला या परिषदेत सादर होणाऱ्या शोधनिबंधाच्या पुस्तिकेचे प्रकाशन श्री. पोपटराव पवार यांच्या हस्ते झाले.

आपल्या बीजभाषणात श्री. पोपटराव पवार म्हणाले की गाव सोडून शहरात आल्यामुळे भारतात इंडिया, भारत, इंडो भारत या तीन जमाती तयार झाल्या.

---

जो पाप करतो तो माणूस, ज्याला त्याबद्दल दुःख वाटते तो संत, जो त्याबद्दल फुशारकी मारतो तो सैतान. - टी. फुलर

महात्मा गांधीनी दिलेल्या गावाकडे चला या महत्त्वाच्या संदेशाचा दाखला देत पवार म्हणाले की गावाकडून शहरामध्ये स्थलांतरीत होणाऱ्या वाढत्या प्रमाणामुळे शहरांवर मोठा ताण येत आहे. शहरांना लागणाऱ्या वाढत्या पाण्यामुळे गावाकडील शेतीला पाणी मिळत नाही व म्हणूनच महागाई वाढते. निसर्गाची काळजी आपण घेतल्याशिवाय निसर्ग आपली काळजी घेणार नाही हा सल्ला त्यांनी दिला.

हिवरे बाजार गावात सरपंच झाल्यानंतर केलेल्या विधायक कामांची माहिती देत ग्राम संसद, शाश्वत विकास-शाश्वत आनंद, जलसंधारण, पुतळा विरहित गाव, व्यसनमुक्ती, विवाहपूर्व एचआयव्ही तपासणी इत्यादी आदर्श योजना गावात आणून दुष्काळी उजाड गावचं नंदनवन फुलवताना ची कृतार्थ भावना पोपटराव पवारांनी व्यक्त केली.

तंत्रज्ञान व अध्यात्म यांची सांगड आपल्या लोकसंस्कृती मध्ये होती, आपल्या सणवारांची योजना त्या रीतीने आपल्या पूर्वजांनी केली होती मात्र आधुनिकतेच्या नादात आपण निसर्गाला विसरत आहोत.

पुराणातील सगर राजांची गँगावतरणाची कथा सांगत सर्वात पहिली जलसंधारणाची योजना भगवान शिवांनी कैलास मानसरोवर येथे राबवली. १५० देशात पाण्यासाठी टोकाचा संघर्ष सुरू आहे, चीन पाकिस्तान व भारत यांच्या संघर्षाच्या मुळाशी पाण्याची भेडसावणारी समस्या आहे. या समस्येवर विद्यार्थीदशेपासूनच आपण सजग व्हायला हवे, अशा अनेक उद्‌बोधक गोष्टी सांगत उपस्थितांना त्यांनी मंत्रमुग्ध केलं.

शहरांनी पाणी वाचवायला शिकलं पाहिजे व गावांनी पाणी जिरवायला शिकलं पाहिजे हा संदेश पवारांनी दिला. विद्यार्थ्यांच्या सामाजिक व आध्यात्मिक जाणीवा प्रगल्भ करणाऱ्या अभ्यासक्रमाची नितांत गरज आहे असे त्यांनी आवर्जून नमूद केले. विद्या प्रसारक मंडळाने दूरदृष्टी दाखवत अत्यंत महत्त्वाच्या विषयावर ही परिषद भरवली हे कौतुकास्पद आहे असेही ते म्हणाले. महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या शहापूर मधील टाकी पठार गावची पाहणी करण्यासाठी येण्याचेही त्यांनी आश्वासन दिले.

या परिषदेसाठी मा मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी शुभेच्छा संदेश पाठवला होता. त्याचेही वाचन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुजा रॉय अब्राहम यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. विमुक्ता राजे यांनी केला. तर प्रा. मृन्मयी थत्ते यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**स्मार्ट सिटीझनच स्मार्ट सिटी घडवतील: डॉ महेंद्र कल्याणकर**

विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालयात 'स्मार्ट सिटीज : द रोड अहेड' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचा समारोप ठाण्याचे जिल्हाधिकारी




डॉ महेंद्र कल्याणकर यांच्या भाषणाने झाला. ठाणे महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता श्री सुधीर गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ सुचित्रा नाईक यांनी स्मार्ट सिटीज वरील दोन दिवसीय परिषदेत चर्चिलेल्या शोधनिबंधांवर प्रकाश टाकला .

समारोपाच्या भाषणात ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ महेंद्र कल्याणकर म्हणाले की, ठाण्याला स्मार्ट सिटी बनवण्यासाठी ठाण्यातील नागरिकांनी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मिळून एकदिलाने काम करावे लागेल. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी स्मार्ट सिटी संदर्भात प्रकल्प हाती घेऊन काही महत्त्वाच्या सूचना प्रशासनाला दिल्या तर शहराचा विकास गतिशील होईल असेही ते म्हणाले. स्मार्ट सिटीवर काम करणाऱ्या सर्वच अभ्यासकांनी, ठाण्यातील नागरिकांनी तसेच विद्यार्थ्यांनी या अभियानात हिरिरीने भाग घेऊन ठाण्याला सुंदर बनवता येईल असं ते म्हणाले. स्मार्ट ठाणे बनवण्यासाठी स्मार्ट सिटीझन घडवावे लागतील असा संदेश त्यांनी दिला. विद्या प्रसारक मंडळाने दूरदृष्टी दाखवत अत्यंत महत्त्वाच्या विषयावर ही परिषद भरवली हे कौतुकास्पद आहे असेही ते म्हणाले.

ठाणे महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता श्री. सुधीर गायकवाड यांनी स्मार्ट ठाणे या विषयावर सादरीकरण केले. ठाण्याच्या भविष्यातील विकासासाठी शासनाच्या वेगवेगळ्या योजनांची त्यांनी यावेळी माहिती दिली. राष्ट्रीय परिषदेत सहभागी झालेल्या संशोधकांनी यावेळी आपले मत व्यक्त केले. या परिषदेस संशोधक, विद्यार्थी व प्राध्यापक मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वेदवती परांजपे यांनी केले व परिषदेच्या समन्वयिका प्रा. नीलम शेख यांनी उपस्थितांचे आभार मानले .

**‘ऋत’ या अ-नियतकालिकेचे उद्‌घाटन**




ठाण्याच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयात ‘ऋत’ या महाविद्यालयाच्या अ-नियतकालिकाचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. बीएमएम विभागा तर्फे प्रकाशित होणाऱ्या ‘ऋत’ची ही आठवी आवृत्ती.

याप्रसंगी पत्रकारिता क्षेत्रातील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व राही भिडे यांची मोलाची उपस्थिती लाभली.‘पुण्यनगरी’ या वर्तमानपत्राच्या त्या संपादक आहेत. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते वृत्तपत्राचे प्रकाशन झाले.

तानुबाई बिर्जे या आपल्या देशातील पहिल्या महिला संपादक. त्यानंतर घडलेल्या महिला संपादक म्हणजे राही भिडे. त्यांनी ‘पत्रकारिता क्षेत्रातील महिलांचे प्रतिनिधित्व’ या विषयावर भाष्य केले व त्यांचे काही अनुभव कथित केले. त्या म्हणाल्या, राजकीय क्षेत्रातील महिला पत्रकारांचे प्रमाण फार कमी आहे. त्यामुळे विशेषतः त्यासाठी युवा पिढीने पुढे आले पाहिजे. ‘ऋत’ ची संकल्पना प्रत्येकाने जाणून घ्यावी.‘ऋत’ म्हणजे चिरंतन सत्य, समतोल असे डॉ. बेडेकर यांनी सांगितले.

प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना Be open to change, be open to criticism असे सांगितले.

डॉ. महेश पाटील, विद्यार्थी संपादक विदिता मूनानकर, शुभम पेडामकर, प्रणालिका चालमेलकर व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सोहळा संपन्न झाला.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात ‘अवयव दान’ वर व्याख्यान**

विद्या प्रसारक मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात नुकतेच ‘अवयव दान’ या विषयावर डॉ. वैष्णा देवेन्द्रम यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

डॉ. वैष्णा या वाशीच्या त्वचापेढी विभागात कार्यरत आहेत. 'त्वचादान' या विषयावर त्यांनी उद्‌बोधक माहिती मांडली. भाजलेल्या रुग्णाला आपण मरणोत्तर त्वचादान करू शकतो. त्यासाठी कोणत्या संकेतस्थळांना भेट द्यायची? एखाद्याच्या निधनानंतर किती तासानंतर आपण त्वचादान करू शकतो? भाजलेल्या जखमांमध्ये तीन प्रकार असतात त्वचा ही फक्त Bandage म्हणून कार्य करते. काढलेली त्वचा किती तास Preserve करता येते? मृत शरीरावरील कोणत्या भागातून त्वचा काढता येते? रक्तगटासारखे त्वचादानासाठी Matching ची आवश्यकता नसते, सुदृढ व जिवंत माणसांची त्वचा आपण घेऊ शकत नाही. ती मरणोत्तरच घेता येते, यासाठी आपल्या नातेवाईकांच्या परवानगीची (Consent) आवश्यकता असते. आपल्या ओघवत्यापूर्ण शैलीत व मधाळ वाणीने त्यांनी या नवख्या विषयाची विद्यार्थ्यांसमोर उकल केली. त्यावेळी Inner Wheel संस्थेच्या श्री. दीक्षित, सौ. पाठक व इतर मान्यवर उपस्थित होते. दोनशे विध्यार्थ्यानी या व्याख्यानाचा लाभ घेतला व यासंदर्भातील गैरसमजुती दूर केल्या.

शेवटी प्रश्नोत्तराच्या रूपात विद्यार्थ्यांनी आपले गैरसमज दूर केले. डॉ. वैष्णा यांनी सर्वच प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देऊन विद्यार्थ्यांच्या मनातील शंका निरसन केले. यातील ८०% विद्यार्थ्यांनी मरणोत्तर देहदान व त्वचादान करण्याचा मानस व्यक्त केला.

जागरजाणिवांचा अभियान अंतर्गत या वेगळ्या विषयाचा जागर करण्याऱ्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. 'अवयवदान याबाबत समाजमाणसातील समज गैरसमज दूर झाले पाहिजेत' असे मत यावेळी समन्वयक प्रा. अनिल आठवले यांनी व्यक्त केले. तर रक्तदानाइतकेच Burned Patients ला त्वचादान होणे ही देखील काळाची गरज आहे असे प्रा. बिपीन धुमाळे यांनी सांगितले.

यावेळी महाविद्यालायचे उपप्राचार्य प्रा. व्यंकटेरमण व इतर शिक्षक शिक्षकेतर सहकारी हजर होते.

राष्ट्रगीताने या उद्‌बोधक व्याख्यानाची सांगता झाली.

**हृदयाच्या आरोग्यासाठी बांदोडकर मध्ये एक हृदय स्पर्शी व्याख्यान**

आजचे स्पर्धात्मक जग, धावपळीचे आयुष्य, आहारविहाराच्या चुकीच्या समजुती, ताणताणाव, अपुरी झोप, वाढती व्यसनाधीनता आणि परिणामी वाढत जाणारे वजन या सर्वांच्या पाश्वभूमीवर वि.प्र.मं. च्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाने जागर जाणिवांच्या अभियानांतर्गत व NSS व NCC यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर सहकारी यांच्यासाठी Cardiac Risk Assessment Prevention यावर माधवबाग ठाणे यांच्यातर्फे प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. प्रसाद देशपांडे यांचे माहितीपर व्याख्यान पतंजली सभागृहात आयोजित केले होते.

Body Mass Index (BMI) म्हणजे काय? किती तास Sound Sleep ची शरीराला गरज असते? रक्तवाहिन्यांतील Blockages म्हणजे हृदयरोग का? Angioplasty म्हणजे काय?, By- Pass Surgery म्हणजे काय?, हृदयरोगाचा झटका (Attack) येतो म्हणजे नक्की काय होत? इथपासून सुरू होणारे हे डॉ. देशपांडे यांचे व्याख्यान आहारातील साखर बंद करावी, गुळाचा वापर करावा, चपातीच्या म्हणजेच गव्हाच्या ऐवजी बाजरीचा वापर करावा, भात टाळावा, पावसाळ्यामध्ये दही टाळावे, दुग्धजन्य पदार्थ मर्यादित ठेवावीत, कर्बोदूकांचा कमीतकमी वापर आहारात करावा. कारण त्यामुळेच हृदयावर अतिरिक्त ताण येतो. Stress Test पेक्षा तणावविरहित जीवन जगावे, रोज फक्त दहा मिनिटे ध्यानस्त बसावे, थोडा व्यायाम व थोडे पथ्यपाणी पाळावे तर नंतरच्या सर्व Test आणि शस्त्रक्रियांची गरज

भासणार नाही. Meditation आणि प्राणायाम याचा समावेश रोजच्या दैनंदिन जीवनात केल्यास हृदयातील ऑक्सिजनचे प्रमाण नेहमीच चांगले राहील व पुरेशी झोप आणि समतोल आहार घेतल्यास कोणत्याही कोलेस्ट्रॉलची वाढ हृदयात होणार नाही व सर्वांचेच हृदयारोग्य चांगले राहण्यास मदत होईल. Prevention is better than cure असे वैदकशास्त्रात म्हंटले आहे.

वाचन लक्षात ठेऊन आपण हृदयरोग होऊन न देणे हे सर्वात चांगले, तसेच ज्या गोष्टींमध्ये बदल घडविणे शक्य आहे म्हणजे पोटावरील Fat कमी करता येईल, टाळता येतील. आहारपद्धतीमध्ये बदल करता येतील, आपली रोजची जीवनशैली बदलता येईल. शांत व स्पर्धाशून्य आयुष्य जगता येईल. इत्यादी गोष्टींवर डॉ. देशपांडे यांनी ऊहापोह केला.

नौपाडा ठाणे येथील 'माधवबाग' या Heart Care संस्थेच्या प्रतिनिधी वैशाली बागडे या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी. त्यांच्या मार्फत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी या व्याख्यानाचे आयोजन केले होते. कारण शिक्षकेतर सहकाऱ्यांमध्ये अनेक जण Overweight किंवा BMJ हा High Scale वर असणारे असतात म्हणून शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांसाठी या विशेष व्याख्यानाचे आयोजन केले होते.

**ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. बाळ फोंडके यांचे विज्ञान संशोधनावर हितगुज**

विद्या प्रसारक मंडळ व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान ठाणे, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'संशोधनातील विद्यार्थ्यांशी हितगुज' या विषयावर ज्येष्ठ भौतिक शास्त्रज्ञ व डॉ. होमी भाभा यांचे विद्यार्थी विज्ञानाचे अभ्यासक व विज्ञान कथाकार डॉ. बाळ फोंडके यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, ठाणे यांनी गेल्या वर्षी ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांचे व्याख्यान आयोजित केले होते. आता दरवर्षी एका शास्त्रज्ञाचे व्याख्यान बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात आयोजित केले जाणार आहे असे मत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे श्री. नाले यांनी व्यक्त केले.

प्रमुख पाहुणे व व्याख्याते डॉ. बाळ फोंडके यांनी का?, कसे?, कधी?, कुठे? अशा नेहमी पडलेल्या प्रश्नांतून आपल्या अनौपचारिक व्याख्यानाला सुरुवात केली व शेंगदाण्याच्या तेलाची घनता जर माहीत असेल तर ते किलो मध्ये घेतले तर स्वस्त मिळेल की लिटर मध्ये? इथपासून ते कृष्णविवरे यांची गुरुत्वाकर्षणक्षमता इतकी अफाट कशी? विश्वाचा पसारा कसा वाढत जातोय? तो प्रसरण होऊन किती होईल? की आकुंचन पावेल? हे विश्व म्हणजे आहे तरी काय नक्की? तो एका चादरीप्रमाणे ताणलेला पडदा आहे की कसे? आपण खाली पडतो म्हणजे नक्की काय होते? सूर्याचे आयुर्मान किती? इतर ग्रहांवर मानवजात किंवा इतर जीव असू शकतात काय? असतील तर त्यांच्याशी संपर्क का प्रस्थापित करता येत नाही? या आणि अशा अनेक प्रश्नांवर त्यांनी तात्विक व वैज्ञानिक विवेचन केले. आणि बांदोडकर महाविद्यालया पुढे संशोधनामध्ये काम करू पाहणाऱ्या २०० विद्यार्थ्यांनी या अभ्यासपूर्ण व वैज्ञानिक व्याख्यानाचा आस्वाद घेतला प्रा. नितीन आरेकर यांनी सूत्रसंचालन केले व श्री. नाले यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले यावेळी प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांचा मुंबई विद्यापीठाच्या अभ्यास मंडळ सदस्य पदी निवड झाल्याबद्दल सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

राष्ट्रगीताने या माहितीपूर्ण व वैज्ञानिक हितगुजाची सांगता झाली.

---

महान सत्ये अगदी साधीसुधी असतात; थोर माणसेदेखील. – जे. हेअर

### महाविद्यालयात संविधान दिवस संपन्न

विद्या प्रसारक मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात संविधान दिनानिमित एका छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. यामध्ये संविधानाच्या प्रास्ताविकाचे वाचन करण्यात आले. व २६ / ११ च्या मुंबईवरील हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या वीरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच ह्या दिनानिमित्त राष्ट्रीय छात्रसेनेची प्रभात फेरी काढण्यात आली .

### गणित का? या विषयावर डॉ. व्ही. एन. बेडेकर मेमोरियल व्याख्यान

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात गणित विभागातर्फे गणित विषयावर डॉ. व्ही. एन. बेडेकर यांच्या मेमोरियल व्याख्यानाचे आयोजन केले होते. डॉ. अजित कुमार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. अजित कुमार यांनी विद्यार्थ्यांना गणित कशासाठी या विषयावर व्याख्यान दिले. गणिताचे महत्त्व समजावून सांगणारे शास्त्र म्हणजे संस्कृतमधील एक श्लोक उद्धृत करून गणिताचे शास्त्र सर्व विज्ञान राणी म्हणून वर्णन करते. नंतर त्यांनी गणिताचे महत्त्व समजावून देणाऱ्या प्रसिद्ध गणितज्ज्ञांच्या ओळी उद्धृत केल्या. डॉ. अजित कुमार यांनी भौतिकी, अभियांत्रिकी, संगीत, आर्किटेक्चर, औषध, अर्थशास्त्र आणि वित्त, संरक्षण, पर्यावरण विज्ञान, क्रीडा, डेटा खनन, हस्तलेखन / चेहरा ओळख यासारख्या विषयांवर गणिताचे महत्त्व सांगितले. त्यांनी गणित कसे दिसावे हे देखील स्पष्ट केले. फिबोनॅकी अनुक्रमांच्या मदतीने निसर्गात नंतर त्यानी गुगल सर्च इंजिनच्या पेज रँक अल्गोरिदम मागे गणिताची माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना गणित विषयाच्या कोणत्याही विषयांवर लहान प्रकल्प करण्यास प्रेरित केले. यावेळी विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

सिंगापूरमध्ये दिनांक ११ आणि १२ डिसेंबर २०१७ दरम्यान ७ व्या वार्षिक आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. ही परिषद जागतिक विज्ञान आणि तंत्रज्ञान मंच (जीएसटीएफ) तर्फे आयोजित केली जाते. मानव संसाधन व्यवस्थापन आणि व्यावसायिक विकास – २०१७ या विषयावर आधारित या परिषदेमध्ये अनेक देशांतील विद्वानांनी सहभाग घेतला.

डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था (BRIMS) मधील सहाय्यक प्राध्यापिका डॉ. सुखदा तांबे, यांनी दिनांक ११ डिसेंबर २०१७ रोजी या परिषदेत 'निवडक संघटनांमधील नोकरीतील समाधान व नोकरीतील ताणतणाव या मधील संबंधाचा प्रायोगिक अभ्यास' ('An Empirical Study of Relationship between Job Satisfaction and Job Stress in Select Organizations') या विषयावर आपल्या शोध निबंधाचे सादरीकरण केले. तर दिनांक १२ डिसेंबर च्या सत्राचे अध्यक्षपद भूषविण्याचा सन्मान त्यांना मिळाला व तसेच या सत्रामध्ये सादर झालेली सादरीकरणे श्रेणीबद्ध करण्याची जबाबदारी देखील त्यांनी पार पाडली.

या दोन दिवसीय परिषदेत वर्तणुक विज्ञान, आणि मानव संसाधन व्यवस्थापन क्षेत्रातील विविध विषय जसे संगठनात्मक ओळख, व्यवसायाच्या उत्ताधिकाऱ्याचे नैतिक ज्ञान, वर्तणुकीतील बदल, नोकरीतील समाधान, संघ रचनात्मकता, प्रतिभा संपादन, कार्य-कुटुंब संवर्धन, संस्थात्मक बांधिलकी, ई-एचआरएम, जागतिक प्रतिभा व्यवस्थापन, इत्यादी विषयांची चर्चा झाली.

या परिषदेने शैक्षणिक आणि औद्योगिक व्यावसायिकांना विचार आणि संशोधन यांचे आदान प्रदान करण्यासाठी एक जागतिक बौद्धिक मंच उपलब्ध

मोठेपणाइतकी साधी गोष्ट दुसरी नाही; साधेपणा हाच मोठेपणा. – इमरसन

करून दिला. विद्वानांना आता जगभरातील त्यांच्या सारख्या समविचारी व समकक्ष व्यक्तींचा सक्रिय सल्ला आणि संशोधन सहयोग मिळविण्या साठी, त्यांचे एक जालव्यूह (Network) तयार करण्यासाठी व्यापक व्यासपीठ मिळाले हे या परिषदेचे एक फलित आहे ज्यामुळे शैक्षणिक सहकार्यासाठी आणखी मार्ग निर्माण होतात. या परिषदेने डॉ. तांबे यांना याक्षेत्रातील तज्ज्ञांसोबत विचार विनिमय व बौद्धिक चर्चा करण्याची संधी दिली, ज्यामुळे जागतिक सहयोगी संशोधनासाठी संधी उपलब्ध होऊ शकतात.

मानवी संसाधनासाठी सुधारित पद्धतींव्यतिरिक्त मानवी संसाधन उत्पादकता आणि कार्यक्षमता वाढवू शकतात अशा योग्यता, कौशल्य, ज्ञान आणि 'सकारात्मक वृत्ती' सारख्या महत्त्वाच्या गुणधर्मावरही परिषदेत चर्चा करण्यात आली. मनुष्यबळ व्यवस्थापनाची गरज, मानव संसाधन पद्धती सुधारण्यासाठी कर्मचारी आणि त्यांचे कार्यरत गट यांना सक्षम बनविणे, त्यांना सृजनशील, अभिनव आणि स्वयंप्रेरित होण्यास मदत करणे आणि मानव संसाधन व्यवस्थापनामध्ये माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा सक्रिय वापर करणे महत्त्वाचे आहे असे निष्कर्ष या परिषदेमध्ये झालेल्या चर्चेतून मिळाले.

•••

दि
शा
नियमित
वाचा.

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*

(पृष्ठ क्र. २२ वरून – **चरित्रलेखनाबाबत...**)

'शेलेचा पाण्याशी अतूट संबंध होता. त्याचे जीवन पाण्याशी इतके संबद्ध झाले होते की, त्याला पाण्यात बुडून आलेला मृत्यू हा ईश्वरी योजनेचा जणू काही भाग असावा, असा भास होतो.

... लहानपणी कागदाच्या होड्या करून तो खेळला, घराशेजारीच ओढा होता. इंग्लंडमध्ये ईटनच्या शाळेत त्याचे आवडते विश्रांतीस्थान होते, शाळेजवळची नदी. पुढे त्याची पहिली पत्नी हेरिएट हिला मृत्यू आला तो पाण्यात बुडाल्यामुळे. दुसरी पत्नी केली. तिच्यासोबत प्रदीर्घ प्रवास केला, तोसुद्धा बराचसा जलप्रवास होता... आणि त्याचा अंत झाला तोसुद्धा समुद्राच्या पाण्यात...'

अशी मर्मस्पर्शी प्रतिकांची चरित्रे अविस्मरणीय ठरल्यास नवल नाही. वाटेल त्याने एखाद्याचे स्तुतिस्तोत्र गावे इतके सोपे असते तर, प्रत्येक कामगार आपल्या मालकाचा 'शाहीर' झाला असता! चरित्रात जितका तपशील देता येतो, तितका पाच-दहा पानांच्या स्वभावचित्रात नाही देता येत. स्वभाव-रेखाटन करताना स्वभावाच्या काही पैलूंचा परिचय देता येतो. चरित्राचा एकूणच आवाका ऐसपैस असतो. त्यात स्वभावास मोठा अवकाश मिळतो.

**– अरविन्द दोडे**
शालन भोईर वाडी, खोपट,
साहिल हॉस्पिटलजवळ,
ठाणे (प.).४०० ६०१
भ्रमणध्वनी : ९८१९१९५५९२

•••

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय)**

their religious customs violated by what are conventionally called the blessings of British rule!... parliament cases its conscience, regarding these tyrannies and wrongs in India by exhorting those that govern there to govern 'paternally', just as Isaac Walton exhorts his angler, in hooking a worm, to handle him as if he loved him".

इंग्रज हे दुधखुळे किंवा मूर्ख नव्हते. त्यांना साम्राज्य चालवायचे होते. राज्य चालवणे आणि धर्मादाय संस्था चालवणे यातला फरक त्यांना चांगला समजत होता. १९१९ ला मॉन्टेग्यू साहेबांनी भारतावर उदार होऊन काही उदारमतांचा वर्षाव केला अशी आजही काही इतिहासकारांची समजूत आहे. १९४१ सालच्या 'वाङ्मयशोभा' या मासिकात साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी 'प्रवाही राजकारण' हा लेख लिहिला आहे. चर्चिल महाशयांच्या भाषणग्रंथाच्या प्रस्तावनेतील त्यांनी केलेला मराठी अनुवाद इंग्रजांचा मुत्सद्दीपणा आणि कुटिल राजकारणावर बरेच काही सांगून जातो.

''१९१९ साली इंग्लंडात सनदशीर प्रधानमंडळ नव्हते. फक्त युद्धमंडळ होते. त्याचे मन वळवून मॉन्टेग्यू साहेबांनी हिंदुस्थान विषयक उदारमतवादी घोषणा केली. त्याला नाइलाज म्हणून आम्ही संमती दिली. शिवाय मॉन्टेग्यू झाले तरी खाजगी भाषणांत आम्हांला सांगत असत की, ''अहो! तुम्ही खुळे लोक हो, या घोषणेने भिता बिचकता का? ती घोषणा, १९१९ च्या कायद्याची प्रस्तावना आणि त्यातील ४१ वे कलम ही सर्व एकत्र विचारांत घ्या, म्हणजे कळून येईल की, आम्ही हिंदुस्थानाला खरे दिले असे काहीच नाही! फक्त आम्ही एक प्रयोग करण्याचा बहाणा करीत आहो. तो वाटेल तेव्हा बंद करू किंवा दिलेले हक्कही परत घेऊ. द्यायला जितका वेळ तितकाच काढून घेण्याला. दिल्लीत नवे विधीमंडळ निर्माण करीत आहो, पण त्याला एखाद्या डिबेटिंग सोसायटीपलीकडे काय अधिकार आहेत? साम्राज्य सरकारला विरोधी ठरेल असा सत्तेचा एक अंशही आम्ही दिलेला नाही.''

इंग्रजांच्या काळातील कायदा, सुव्यवस्था आणि न्याय यांच्याबाबतीतही असाच भ्रम आहे. इंग्रजांच्या न्यायव्यवस्थेवर ३० ऑक्टोबर १९१५ च्या The New York Times मध्ये अर्थतज्ज्ञ Mr. S. R. Wagel यांची टिपणी बोलकी आहे. ते लिहितात,

"The Courts of justice in India are reasonably good so long as the dispute is between Indian and Indian. But when it is a political case, or when it is a dispute between an Indian and an Englishman, there is no justice at all in nine cases of ten."

१९२३ साली म्हणजे, इंग्रजांनी पेशव्यांचा पराभव केल्यानंतर सुमारे १०० वर्षांनी घडलेली ही घटना आहे. एक इंग्रज सैनिक पुण्याजवळील लोहगांव परिसरात शिकारीकरता गेला. तेथील गावकऱ्यांबरोबर त्याचे भांडण झाले आणि त्याने चक्क गोळी घालून एका गावकऱ्याला ठार केले. युरोपियन ज्युरी आणि न्यायाधीश असलेल्या तत्कालीन कोर्टाने त्या सैनिकाची निर्दोष सुटका केली. साहित्य-सम्राट श्री. न. चिं. केळकर हे त्यावेळी पुणे नगरपरिषदेचे अध्यक्ष आणि केसरीचे संपादक होते. आपल्या संपादकीयात त्यांनी या घटनेची घेतलेली नोंद बरेच काही सांगून जाते.

"Such farces of trials of Europeans accused of crimes against Indians are not new among us. They date back to the times of Waren Hastings. The thing to be most regretted is that with such things taking place before their very eyes there are persons who keep singing the praise of British Justice. By good rights a pillar ought to be erected at Lohagoan having engraved on it the full details of this case, as a memorial showing what value is attached to the lives of Indians under British rule."

ब्राह्मण पेशव्यांना हरवून कनवाळू इंग्रजांनी अशा कितीजणांना गोळ्या घालून ठार मारले असेल याची गणती नाही. इंग्रजांच्या साम्राज्यवादाच्या कालावधीमध्ये त्यांच्या धोरणांमुळे भारतात दुष्काळ पडून काही कोटी लोक मृत्यूमुखी पडले. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळेस या

साम्राज्यवादी धोरणांमुळेच भारतात अनेक ठिकाणी अन्न तुटवडा होऊन, दुष्काळ सदृश परिस्थिती निर्माण झाली, आणि लोक मृत्युमुखी पडायला लागले. चर्चिल यांची त्यावेळची प्रतिक्रिया होती, ''गांधीजी तर अजून जिवंत आहेत ना!''

अशा 'दयाळू' इंग्रज साम्राज्यवाद्यांच्या विजयाचे महोत्सव साजरे व्हायलाच हवेत ना!! समता, बंधूता, सहिष्णूता आणि विशेष म्हणजे जाती निर्मुलन या आपल्या घटनेतीत विचारांचेच, हे इंग्रजांच्या विजयाचे स्तंभ नाहीत का? त्यावर पुष्पवृष्टीही व्हायलाच हवी.

जगातले कुठलेही युद्ध केवळ शौर्यामुळे जिंकले जात नाही. फंदफितुरी, दारुगोळ्याचा पुरवठा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे व्यूहरचना करणारे नेतृत्व युद्ध जिंकून देते किंवा हरायला कारणीभूत ठरते. इंग्रजांनी नेपोलियनला हरवले, पण म्हणून तो कमी शूर नव्हता.

जगातला प्रत्येक सैनिक हा शौर्यानेच लढत असतो. त्याचे जातीय राजकारण फक्त भारतातच होऊ शकते.

१६०० साली इंग्रज जेव्हा भारतात आले तेव्हा भारत एक सधन, सुसंस्कृत राष्ट्र होते. जागतिक व्यापारामध्ये भारताचे योगदान २३% होतं, तर इंग्लंडचे फक्त १.८% होतं. १९४७ साली भारत जेव्हा स्वतंत्र झाला तेव्हा भारताची जागतिक व्यापारातील टक्केवारी ३% होती. तर इंगलंडची १०% होती. इंग्रजांनी फक्त पेशव्यांचा पराभव केला नव्हता, त्यांनी जवळजवळ संपूर्ण भारतावरती आपले साम्राज्य प्रस्थापित केले होते. हा विजय नुसता भौगोलिक नव्हता, तर पुढील १५० वर्षात त्यांनी भारतावर सांस्कृतिक विजय मिळवला. महसूल, न्यायदानापासून शिक्षणापर्यंत सर्व परंपरागत व्यवस्थांना मूठमाती देऊन वसाहतवादाला पोषक व्यवस्था उभ्या केल्या. एवढेच नाही तर त्याचे गोडवेही आपण गाऊ अशी व्यवस्था इतिहास लेखनाच्या माध्यमातून करून ठेवली.

जातीयवादाच्या माध्यमातून 'तोडाफोडा' राजनीतीचा हा विजय होता आणि आहे. सगळ्या जगानी २०१८ मध्ये प्रवेश केला. भारत मात्र १८१८ मध्ये रेंगाळला, आणि ब्रिटिशांच्या शौर्याचे समारंभ साजरे करत राहिला.

धन्य ते ब्रिटिश, त्यांची मुत्सद्देगिरी आणि दूरदृष्टी.

डॉ. राधाकृष्णन् यांनी १९२७ साली दिलेल्या एका भाषणात, शिक्षणाचा उद्देश काय असावा, हे विशद केले होते, (The Modern Review, Culcutta, May 1927).

"The aim of true education should be to keep alive the spark of national pride and self-respect. If we lose our wealth and resources we may recover them tomorrow, if not today; but if we lose our national conciousness, there is no hope for us."

मॅकॉलेचेही म्हणणे हेच होते. फक्त त्याच्या समोरील राष्ट्र हे इंग्लंड होते. मॅकॉलेचा मेहुणा Sir Charles E. Trevelyan यानी १८५३ साली इंग्लंडच्या पार्लमेंट कमिटीला भारताच्या शिक्षण पद्धतीवरती एक टिपणी सादर केली होती. त्यामध्ये ते लिहितात,

"The Romans at once civilized the nations of Europe, and attached them to their rule by Romanising them, or, in other words by educating them in the Roman literature and arts and teaching them to emulate their conquerors instead of opposing them. Acquisitions made by superiority in war, were consolidted by superiority in the arts of peace; and the remembrance of the original violence was lost in that of the benefits which resulted from it."

ज्या राष्ट्राला असे द्रष्टे नेते लाभतात त्यांचा सांस्कृतिक वसाहतवाद कधीच संपत नसतो. लढाईतील विजय हा तत्कालीन असतो. सांस्कृतिक विजय हा चिरकाल टिकतो आणि त्याला शौर्यापेक्षा जास्त गरज असते ती मुत्सद्देगिरीची. म्हणूनच भिमा-कोरेगांव येथील स्मारक हे लढाईतील विजयाचे स्मारक नसून, वसाहतवादी मुत्सद्दगिरीचे स्मारक आहे. स्वतंत्र भारतातील राजकारण्यांच्या वैचारिक दिवाळखोरीचेही ते तेवढेच स्मारक आहे!

**- डॉ. विजय बेडेकर**

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| **सभागृहाचे नाव** | **ठिकाण** | **आसन क्षमता** |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❈ संपर्क ❈

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.